शनिवार, १६ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ४७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 16 SEPT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-47 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# राजा खातोय तुपाशी, शेतकरी मात्र उपाशी ! फाईव्ह स्टार मराठवाडा मंत्रिमंडळ बैठक !!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राजा खातोय तुपाशी, शेतकरी मात्र उपाशी. सरकारने जनाची नाही तर मनाची तरी लाज ठेवावी. विश्रांतीला फाईव स्टार हॉटेल, जेवायला १५०० रुपयांची थाळी..., दुष्काळग्रस्त भागासाठी कॅबिनेट बैठक आहे की, महायुतीच्या मंत्र्यांचे पर्यटन?, असे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला.**



### ५० हजार कोटींच्या पॅकेजचे काय झाले?

फडणवीस सरकारने २०१६ ला दिलेले पॅकेज मराठावाड्यातील जनता विसरली नाही. ५० हजार कोटींच्या पॅकेजचे काय झाले? मराठवाड्यातील जनता अशा नालायक सरकारला माफ करणार नाही, असेही वडेट्टीवार म्हणाले.

मराठा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनरगरात शनिवारी मंत्रिमंडळ बैठक होत आहे. या बैठकीसाठी संपूर्ण मंत्रिमंडळ मराठवाड्यात दाखल होत आहे. या मंत्र्यांच्या राहण्याची, खाण्याची सोय करण्याकरता सरकारने लाखो रुपये खर्ची केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. मंत्रिमंडळ बैठकीसाठी नम्रता कॅटर्सला जेवणाचे कंत्राट देण्यात आले असून, एका थाळीची किंमत १ हजार ते दीड हजार आहे, असा दावा राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्यांनी ट्वीट करून ही माहिती दिली.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जनाची नाही तर मनाची लाज बाळगली पाहिजे. १७ तारखेला होणाऱ्या कॅबिनेट बैठकीत मंत्री मराठवाड्यात पर्यटनासाठी येत आहेत का असा प्रश्न आहे. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये व्यवस्थापन करणारे हे पहिले सरकार आहे. सर्वाधिक आत्महत्या मराठवाड्यात होत आहेत. सरासरी प्रत्येक जिल्ह्यात मागच्या ऑगस्टमध्ये शंभर ते सव्वाशे आत्महत्या झाल्या आहेत. शेतकरी त्रस्त आहे. ९६ तालुके दुष्काळाच्या छायेत आहेत. मराठवाडा दुष्काळाच्या छायेत असातना फाईव्ह स्टार व्यवस्था करून कॅबिनेट बैठक घेण्याची गरज का पडली हा खरा प्रश्न आहे.

कॅबिनेटच्या नावाखाली मौजमस्ती करायला तर हे सरकार येत नाही ना, असा विषय चर्चेला आला आहे. यापूर्वी कॅबिनेटच्या बैठका झाल्या, पण मंत्री कधीही फाईव्ह स्टारमध्ये थांबले नव्हते. फाईव्ह स्टारचा पाहुणचार घेतला नव्हता. विलासराव देशमुख, अशोक चव्हाण किंवा यापूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी बैठका घेतल्या तेव्हा गेस्ट हाऊसमध्ये थांबून बैठका घेतल्या. हजारो थाळ्यांची जेवणाची प्लेट, पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्काम आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत. सरकारला जनाची नाही पण मनाची लाज वाटत असेल तर जरा तरी विचार करावा.

- **फाईव्ह स्टार हॉटेल 30 रूम बुक** (मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री)
- **ताज हॉटेल 40 रूम बुक** (सर्व सचिव)
- **अमरप्रीत हॉटेल 70 रूम बुक** (उपसचिव, खासगी सचिव, कक्ष अधिकारी)
- **अजंता ॲम्बेसेडर 40 रूम बुक** (उपसचिव, खासगी सचिव, कक्ष अधिकारी)
- **महसूल प्रबोधिनी 100 रूम** (सुरक्षा रक्षक, वाहनचालक)
- **पाटीदार भवन 100** (सुरक्षा रक्षक, वाहनचालक)
- **वाल्मी, सिंचन, महावितरण, सुभेदारी विश्रामगृहे – 20** (इतर अधिकारी)
- **एकूण 150 गाड्या नाशिक येथून भाड्याने घेण्यात आल्या आहेत.**
- **छत्रपती संभाजीनगरात 150 गाड्या भाड्याने घेण्यात आल्या.**

## महत्त्वाची बातमी

### केरळला निपाचा विळखा, बाधितांची संख्या वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** निपा विषाणूचा संसर्ग केरळमध्ये वाढत असून आज पुन्हा एका बाधिताची नोंद झाली आहे. त्यामुळे केरळमध्ये निपा बाधितांची एकूण संख्या सहा झाली आहे. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला असून चौघांवर उपचार सुरू आहेत. यामध्ये एक नऊ वर्षांचा मुलगाही आहे. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

नव्याने बाधित झालेला रुग्ण ३९ वर्षीय असून त्याच्यावर कोझिकोड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुरुवारी संशयित रुग्णांची चाचणी केली होती. या संशयित ११ बाधितांचा चाचणी अहवाल निगेटिव्ह आला आहे. निरीक्षणाखाली असलेल्या रुग्णांची संख्या ९५० वर पोहोचली आहे. त्यापैकी २३१ रुग्ण अतिजोखमीच्या श्रेणीतील असून २१ रुग्णांना रूग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. राज्य सरकारने कोझिकोड जिल्ह्यात प्रतिबंधात्मक नियम लागू केले आहेत. तसंच, नऊ पंचायती कंटेन्मेंट झोन म्हणून घोषित करण्यात आले असून तिथे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. कोझिकोड जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था शनिवारपर्यंत बंद राहणार असून २४ सप्टेंबरपर्यंत सर्व मेळावे व कार्यक्रमांना बंदी घालण्यात आली आहे.कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारने कोझिकोड येथील मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये ७५ आयसोलेशन रूम, सहा आयसीयू आणि चार व्हेंटिलेटर तैनात केले आहेत. दिल्लीतील नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोलचे सहा सदस्यीय पथक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कोझिकोडला पोहोचले आहेत.

# माध्यमांवर बहिष्कार टाकणे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आल्याचे प्रतीक : वसंत मुंडे

## इंडिया आघाडीच्या फतव्याचा जोरदार निषेध

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** प्रत्येक पक्षाची भूमिका, मत - मतांतरे भिन्न असू शकतात. मात्र देशातील १४ प्रमुख वृत्तवाहिन्यांच्या कार्यक्रमांवरच बहिष्कार टाकणे, हा प्रकार प्रसार माध्यमांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाही धोक्यात आल्याचे प्रतीक आहे. इंडिया आघाडीचा करावा तेवढा निषेध कमीच आहे, अशा शब्दांत पंचवीस हजारापेक्षा जास्त सदस्य असलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

विरोधी दलांची मोठ बांधून नव्याने स्थापन झालेल्या इंडिया आघाडीने आपल्या अजेंड्यावर देशातील १४ प्रमुख वाहिन्यांच्या अंकर्सच्या कार्यक्रमात कोणत्याच पदाधिकाऱ्यांनी सहभागी न होण्याचे ठरविले आहे. इंडिया आघाडीच्या समन्वय समितीने हा फतवा काढला आहे. अदिती त्यागी (भारत एक्सप्रेस), अमन चोपड़ा (न्यूज 18), अमीश देवगन (न्यूज 18), आनंद नरसिम्हन (न्यूज 18), अर्णब गोस्वामी (रिपब्लिक भारत), अशोक श्रीवास्तव (डीडी न्यूज), चित्रा त्रिपाठी (आज तक), गौरव सावंत (इंडिया टूडे), नाविका कुमार (टाइम्स नाऊ), प्राची पराशर (इंडिया टीवी), रूबिका लियाकत (भारत 24), शिव अरुर (इंडिया टुडे),सुधीर चौधरी (आज तक) आणि सुशांत सिन्हा (टाइम्स) या १४ अंकर्सच्या कार्यक्रमावर बहिष्कार घातला आहे. तो मागे घेण्यात यावा, अशीही मागणी वसंत मुंडे यांनी केली आहे. लोकशाहीची आदर्श मूल्यं रुजविण्यासाठी आणि जपण्यासाठी माध्यमांची भूमिका आजवर महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. विरोधी दलांचा आवाजही बुलंद करण्याचे काम प्रसार माध्यमे करत असतात. मात्र इंडिया आघाडीने असा निर्णय घेत माध्यमांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रकार केला आहे. या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तीव्र शब्दांत निषेध नोंदवत आहे, असे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले.




छत्रपती संभाजी नगरात शनिवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी संपूर्ण शहरच जणू एखाद्या उत्सवा सारखे सजले आहे. एक हरहुन्नरी, चतुरस्त्र कलावंत सुधीर कोर्टीकर आणि त्यांच्या पत्नी सौ. नयन कोर्टीकर या दांपत्यानी मंत्र्यांच्या स्वागतासाठी विमानतळावर अतिशय सुंदर फुलांच्या रांगोळ्या सजवलेल्या आहेत. हे दोघेजण रांगोळ्या सजवत असतानाच मंत्री महोदय सुधीर मुनगंटीवार, अतुल सावे, अब्दुल सत्तार, उदय सामंत यांनी भेट देऊन कोर्टीकरांच्या रांगोळ्याची प्रशंसा केली.

# कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी

## मुख्यमंत्र्यांनी दिले सार्वजनिक बांधकाम विभागाला निर्देश

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना शनिवार दि. १६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यासंबधीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर ही सवलत लागू असणार आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते, त्यानुसार आज सार्वजनिक बांधकाम विभागाने



पथकर सवलतीचा शासन निर्णय जारी केला आहे. या टोलमाफी सवलतीसाठी 'गणेशोत्सव २०२३, कोकण दर्शन' अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधित प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत, असे आदेश देण्यात आले आहेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्या देखील सूचना आहेत.

श्रावण सरता सरता वेध लागतात ते गणेशोत्सवाचे. बाप्पाच्या आगमनाची तयारी सगळीकडे जोरदार सुरू आहे. कुठे ढोल ताशा पथकांचा सराव तर कुठे स्वागताची लगबग; या सगळ्याने वातावरण उत्साहाने दुमदुमून गेले. गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी चाकरमान्यांनी कोकणातल्या गावच्या वाट धरली आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मुलांसाठी स्वामी विवेकानंद आणि सुधा मूर्ती यांच्या गोष्टीची पुस्तके भेट म्हणून आणली आणि त्यांचं कौतुक केलं. भगवानरावांसोबत भार्गवी वहिनी आणि चैतन्य पण आला होता. आज रात्रीचं जेवण सगळे बरोबरच घेणार होते. भगवानरावांबरोबर मुलांची मैफल छान जमली. पिंकी म्हणाली, ' काका, मागच्या वेळी तुम्ही आम्हाला प्राचीन समृद्ध भारताबद्दल माहिती सांगत होता. पण आपलं बोलणं अपूर्ण राहिलं. तुम्ही म्हणाला होता की पुढील वेळेस आणखी माहिती सांगेन म्हणून. ' ' हो, सांगतो ना बाळांनो. पण आपण आज काय परिस्थिती आहे ते जाणून घेऊ. आज आपण खेड्यात गेलो की आपल्याला त्यांची दुर्दशा झालेली जाणवते बरं का ! कधी पुरेसा पाऊस पडत नाही, त्यामुळे दुष्काळ पडतो. कधी अति पावसाने शेतीचं नुकसान होतं. पिकं हातात येत नाहीत, म्हणून पैसा नाही. पैसा नाही म्हणून गरिबी,बेकारी, उपासमार हे दुष्टचक्र सुरु होतं. गावातील लोकांना काही कामधंदा नाही. कामधंदा मिळवण्यासाठी लोकांचा ओढा शहरांकडे असतो. बरीचशी खेडी त्यामुळे आजकाल उजाड वाटतात. " अगदी बरोबर आहे काका. पण आम्ही सोपानकाकांकडे गेलो होतो, ते गाव आम्हाला आवडलं. पण अशी गावं अपवादात्मक असतील, होय ना काका ? ' ' बरोबर आहे बेटा. पण पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. आता मला सांग आपण स्वतंत्र कधी झालो ?' ' १५ ऑगस्ट १९४७ ला, ' चैतन्य पटकन म्हणाला. ' बरोबर आहे, त्यापूर्वी दीडशे ते दोनशे वर्षे आपण पारतंत्र्यात होतो. म्हणजे आताची स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची ७५ वर्षे आणि त्यापूर्वीची दीडशे वर्षे असा दोन अडीचशे वर्षांचा काळ सोडला तर त्यापूर्वी आपल्या भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. खेड्यांमध्ये आर्थिक सुबत्ता होती. लोकांना रोजगार आपल्या गावातच उपलब्ध होत होता. ' ' म्हणजे बाबा, आज जसे शहरात कारखाने आहेत, तसेच तेव्हा खेडयांमध्ये होते का ? ' चैतन्यने विचारले. बाळांनो, आज जसे आधुनिक यंत्रसामुग्रीने संपन्न असे कारखाने आपल्याला दिसतात, तसे त्यावेळी नव्हते. यंत्रक्रांती किंवा औद्योगिक क्रांती अठरा एकोणिसाव्या शतकात युरोपात आधी झाली. पण त्याआधी शेकडो वर्षांपासून भारतातील ग्रामीण भागातील लोक आपले परंपरागत व्यवसाय करीत होते. जवळपास साडेसात लाख खेडी त्यावेळी भारतात होती. या खेड्यांमध्ये केवळ शेतीच नव्हे तर शेतीला, शेतकऱ्यांना आणि तेथील लोकांना उपयोगी आणि पूरक ठरतील असे व्यवसाय लोक करीत होते.



# स्वयंपूर्ण ग्रामीण भारत



## आनंदी पहाट

# घडण्याची क्रिया व प्रक्रिया बिघडण्यापेक्षा महत्त्वाची

आधुनिक केसरी

लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनकेदा आपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते. जशी आपली संगति, तशी आपली मनोवृत्ती ही बाबही तितकीच महत्वाची आहे. आपण आपल्या सोबत्यांची निवड विवेकपूर्वक करत असल्याची आपल्याला जाणीव होणे जरुरीचे असते. कारण, आपली संगत आपल्यावर वाईट प्रभाव पाडू शकते, ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. जगण्यापलीकडचे जीवन जगताना संगत ही खूप महत्वाची बाब असते. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची- लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. वाईट संगतीत वाईट गुण आपल्यात येण्यास वेळ लागत नाही. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो. परीसाच्या संगतीत लोखंड आल्यावर त्याचे सोने होते. त्यासाठी संगतीचा परिणाम विपरीत ठरू नये,'ही लक्षात घ्यावे. काहीवेळा 'सुसंस्कारित मुले ते गुंड, चोर' अशा ह्या परिवर्तनाला काही प्रमाणात कारणीभूत ठरतो, तो आपल्या मित्रमैत्रिणींचा सहवास. शाळा-महाविद्यालयांत गेल्यावर सगे-सोबती, साथ-संगत चांगली मिळाली नाही म्हणून तरुण वयांतील मुले-मुली वाममार्गाला गेल्याचे ऐकण्यांत आणि पाहण्यात येते. प्रेरणा घेऊन एखाद्या मित्राचे अनुकरण करून वाईट सवयी लावून घेणे, अर्वाच्च भाषेत बोलणे, व्यसनाधीन होणे अपायकारक आणि हानिकारक असल्याची जाणीव होणे महत्वाचे असते.



आधुनिक केसरी

## कर्माचा संबळ | धन्य झाला ||

अंबेच्या दरबारी | वाजु दे संबळ ||
घालु या गोंधळ | भक्तीमुक्तीचा ||१||
गोंधळास या हो | देवा गजानना ||
पार्वती नंदना | विघ्न हरी ||२||
देव देवता येता | गोंधळ रंगला ||
देह गंधाळला | चंदनाचा ||३||
गोंधळी रमला | आत्माराम माझा ||
विकारांचा बोजा | लुप्त झाला ||४||
त्रिगुण तापाचा | तुटला रे बंध ||
ब्रह्मानंद कंद | हाती आला ||५||
होऊनी निस्संग | घालता गोंधळ ||
कर्माचा संबळ | धन्य झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

तेजश्चौजश्च शान्तिं च देहि शङ्करवल्लभे|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ९० || हे श्रीशंकरवल्लभे, मला तेज, ओज आणि शांती दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अज श्री सद्गुरु देव जी, सत्सुकृत जेहि नाम ।
ब्रह्मविद्या गुरु आदि हैं, चारों युग तिन काम
।।४७।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/४७ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मविद्येचे आदि गुरु श्री सद्गुरुदेव जी आहेत, ज्यांचे नाव सत्सुकृत जी आहे. ते चारही युगांत प्रगट होऊन ब्रह्मविद्येचा संदेश जगजीवांना देतात. तेच ब्रह्मविद्येचे आदि आचार्य सन्तमत प्रवर्तक आहेत.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## सिध्दलक्षण

आधुनिक केसरी

पण स्व स्वरूप हा साधूंचा अक्षय ठेवा असतो तो वेगळा कधीच नसतो.






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

साधू स्वस्वरूपाच्या आनंदात तल्लीन असतात.दुस-याशी कुरघोडी किंवा अरेरावी करण्यासाठी त्यांना वेळ नसतो. म्हणून साधूंच्या जीवनात वादविवादांना, भांडणे, अरेरावी, कुरघोडींना मुळींच स्थान नसते. ते कधीच दुसऱ्याला तुच्छ लेखत नाहीत. सर्वांच्या प्रति त्यांच्या मनात आदराचे स्थान असते, ते कधीच मत्सर करत नाहीत. साधू सहजपणे ब्रम्हस्वरूप असतात, मदमत्सरा चा वेडेपण त्यांच्या कडे नसतो. साधू स्वस्वरूपाकार झालेले असतात, स्वस्वरूप सर्वव्यापी आणि स्वयंभू असते, तेथे "मी तू "पणाला वाव नसतो. त्यामूळे दुसरा कोणी असेल तर दंभ दाखवता येतो,तर जेथे दुसरा नाहींच तेथे दंभ असू शकत नाही. म्हणून साधूंच्या अंगी दंभ नसतो. ते सगुण साकार व निर्गुण निराकार असतात. प्रापंचिक हेवेदावे ते करत नाहीत.

# ज्ञान हे दुहेरी शस्त्र आहे

आधुनिक केसरी

लोककल्याणाच्या तळमळीने जो ग्रंथ लिहितो तो खरा ग्रंथकार होय; वाचनात आलेले आचरणात आणून जो लोकांना सांगतो तो खरा वक्ता होय; आणि सांगितलेले आचरणात आणतो तोच खरा श्रोता आणि साधक होय. अलीकडे ज्ञानप्रसाराची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत.त्यामुळे नको त्या ज्ञानाचाही विस्तार झपाट्याने होतो आहे. ज्ञान हे एक प्रकारचे दुहेरी शस्त्र आहे. कोणत्याही ज्ञानाचा बरावाईट उपयोग, तो करणाऱ्यावर अवलंबून असतो. ज्ञान हे मुळात पवित्र आहे. जे ज्ञान नीति आणि धर्म यांच्या पायावर उभे असते ते जास्त प्रभावी ठरते. सर्वांचे एकमेकांवर प्रेम वाढेल आणि सर्वजण एकत्र येतील असे ज्ञान असावे. श्रीमंत-गरीब, विद्वान-अशिक्षित, लहान-थोर, स्त्री-पुरुष या सर्वांना एकमेकांबद्दल प्रेम, आदर आणि आपुलकी वाढेल, असे ज्ञान व्यक्त झाले पाहिजे. द्वेष-मत्सर वाढवील, नीतिधर्माला फाटा देईल, असे ज्ञान पुस्तकात नसावे. विद्वान शास्त्रज्ञ नवीन शोध लावून जगाला स्वार्थी आणि लोभी बनवितात, आणि त्यामुळे सर्वनाश होतो. जे ज्ञान समाधान देत नाही ते खरे ज्ञान नव्हे. जगाचे खरे स्वरूप ज्याने कळते ते खरे ज्ञान होय.



देहासंबंधी जे ज्ञान ते व्यावहारिक ज्ञान. जे असे आहे तसे ओळखणे हे तत्त्वज्ञान. मी देहाला 'माझा' म्हणतो, अर्थात मी देह नव्हे. 'माझे घर' म्हणणारा 'मी', घराहून वेगळा ठरलो ! जडत्व म्हणजे काय ? देहाच्या ठिकाणी ममत्व हे जडत्व. पदार्थाचे यथार्थ ज्ञान ज्याला आहे तो शहाणा. व्यवहाराचे गूढ ज्याला कळते तो प्रपंची; जगाचे गूढ ज्याला कळते तो तत्त्वज्ञानी. सूक्ष्माचे ज्ञान होणे यात सुख आहे. आत्मा हा समुद्र आहे, तर जीव हा त्याचा अगदी लहान थेंब आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे हेच खरे तत्त्वज्ञान आहे. 'ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या' अशा ज्ञानाच्या गोष्टी कळायला कठीण असल्या, तरी अभ्यासाने दीर्घ काळानंतर कळतील; पण नामाचे महत्त्व कळणार नाही; ते एक संतकृपेनेच कळते. नामावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे; त्यानेच समाधान लाभेल.

ज्या ग्रंथाच्या श्रवणाने भगवंताविषयी प्रेम उत्पन्न होते; ज्याच्या योगाने विरक्ति उत्पन्न होते, अनीतिचे वर्तन टाकून नीतिमार्ग, धर्ममार्ग याचा अवलंब करावासा वाटतो, तो सद्ग्रंथ; उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी, दासबोध, नाथभागवत, हे ग्रंथ वाचून सदोदित त्यांचे मनन करणे, हेच फार जरूरीचे आहे. त्याने ईश्वरप्रेम उत्पन्न होते.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

म्हणजे लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्या शिवाय सोने होत नाही हि त्या ग्रंथाची



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

किमया आहे त्यातील दैवी शक्तीचा अनुभव आहे अशी भावना आपली ज्या ग्रंथा बाबत असते तोच आपला उत्कृष्ठ ग्रंथ असतो मग कोणाचा गीता असेल, कुराण असेल, कुणाचा बायबल, तर कोणाचा आणखी काही. म्हणजे जगात उत्कृष्ठ ग्रंथाची कमी नाही कमी आहे ती या विषयावर आत्मचिंतन करून स्वताचा उद्धार करून घेणाऱ्याची . प्रत्येकाच्या आयुष्यात असा एक उत्कृष्ठ ग्रंथ असायलाच हवा असा ग्रंथ ही आयुष्यात योगायोगानेच येत असतो तुम्ही शोधून सापडत नसतो आणि आपण जर एखादा ग्रंथ उत्कृष्ठ म्हणत असू तर त्या वर आपले जीवापाड प्रेम असावे त्यातील विचार आचरणात आणावे त्याचे मनन करावे व सभोवतालच्या अज्ञानी लोकांना हि आपण ज्या चांगल्या रस्त्यावरून चालत आहोत तो मार्ग जरूर दाखवावा म्हणजे त्या ग्रंथराजाची खऱ्या अर्थाने सेवा होते.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

वाट काढिली गोविंदीं ।मागें गोपाळांची मांदी ॥२॥ अवघा चि वावरे ।कळों नेदी कोणा फिरे ॥३॥ घर पाहोनि एकांताचें ।नवविधा नवनीताचें ॥४॥ रिघे आपण भीतरी ।पुरवी माथुलियाच्या हरी ॥५॥ बोलों नेदी म्हणे स्थिर ।खुणा दावी खा रे क्षीर ॥६॥ धन्य त्या गौळणी इंद्राच्या पूजनीं ।नैवेद्य हिरोनि खातो कृष्ण ॥१॥ अरे कृष्णा इंद्र अमर इच्छिती ।कोण तयांप्रति येइल आतां ॥२॥ तुका म्हणे देव दाखवी विंदान ।नैवेद्य खाऊन हासों लागे ॥३॥ तुम्ही गोपी बाळा मज कैशा नेणा ।इंद्र अमरराणा म्यां चि केला ॥१॥ इंद्र चंद्र सूर्य ब्रम्हा तिन्ही लोक ।माझे सकळीक यम धर्म ॥ध्रु.॥ मजपासूनिया जाले जीव शिव ।देवांचा ही देव मी च कृष्ण ॥२॥ तुका म्हणे त्यांसी बोले नारायण ।व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ॥३॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १६ सप्टेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# अमृतमहोत्सवानंतर तरी मराठवाड्याचा विकास व्हावा

## मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सव : आधुनिक केसरी जनचर्चेत विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

जनचर्चा

मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सवी वर्षाची 17 सप्टेंबर 2023 रोजी सांगता होत आहे. या 75 वर्षाचे विश्लेषण आणि शताब्दीकडे वाटचाल करताना मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील चित्र म्हणावे तसे नोंद घेण्यासारखे वाटत नसल्याची खंत समाजमनात व्यक्त होते. मराठवाड्यात औद्योगिक, रोजगार, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सिंचन, सामाजिक, कृषी, पर्यटन आणि इतर महत्वपूर्ण बाबींची वाटचाल आणि अपेक्षा अशा विविध मुद्द्यांवर परिचर्चा व्हावी म्हणून यानिमित्ताने आधुनिक केसरी जनचर्चेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया...




संकलन: बाळासाहेब जोगदंड

### विकासासाठी पुन्हा जनआंदोलन उभा करावे लागणार...

निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त होण्याच्या घटनेला येत्या 17 सप्टेंबर रोजी 75 वर्ष पूर्ण होत आहेत. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष आपण गेल्या वर्षीपासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करत आहोत. या अमृत महोत्सवी वर्षात खरोखरच चिंतनाचा हा विषय आहे की मराठवाड्याचा सर्वांगीण विकास या 75 वर्षात तरी झाला आहे काय ? तर त्याचे उत्तर नाही असेच मिळेल . मराठवाड्याची जनता या अपेक्षेने भविष्याकडे पाहत आहे की मुक्ती संग्रामाची शताब्दी होईपर्यंत तरी विकास होईल का ? मराठवाड्याच्या या स्वातंत्रलढ्याकडे व नंतरच्या काळातही तत्कालीन राज्यकर्त्यांनी खूप उपेक्षा केली. मुक्ती संग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुतळा मराठवाड्यात व अन्यत्र नाही याची आपणास लाज वाटली पाहिजे. औरंगाबाद शहरात गेल्या अनेक वर्षांपासून पुतळ्यासाठीचा चौथरा उभा केला आहे पण त्यावर अद्याप पुतळा बसवण्यात आला नाही. स्वामीजींचे एक छोटे स्मारक हैदराबाद मध्ये आहे व त्या ठिकाणी दरवर्षी स्वामीजींच्या स्मृती जागवल्या जातात पण मराठवाडा व महाराष्ट्रातील राज्यकर्ते मात्र कृतघ्नपणाने वागत असलेले आपणास पहावयास मिळते. मराठवाडा विनाशर्त महाराष्ट्रात सामील झाला पण सर्वच बाबतीत उपेक्षाच पदरात आली . विकासाच्या सर्व आघाड्यावर मराठवाड्याची पीछेहाट झालेली पहावयास मिळते. औद्योगिक, शैक्षणिक बाबतीत मराठवाडा मागासलेला आहे. मराठवाड्याच्या वाट्याचे हक्काचे पाणी सुद्धा उर्वरित महाराष्ट्र मराठवाड्याला मिळू देत नाही. सर्वत्र रेल्वेचे जाळे निर्माण झालेले पहावयास मिळते पण मराठवाड्यात स्वातंत्र्यानंतर नवीन रेल्वे मार्ग उभारण्यात आलेले नाहीत तसेच इतर सर्व बाबतीत पीछेहाट झालेली पहावयास मिळते. तरीही मराठवाड्याची जनता मूक गिळून बसलेली आहे व जनतेचा अंत शासनाने पाहू नये, हीच मराठवाड्याच्या जनतेची अपेक्षा आहे. या सर्व उपेक्षेमुळेच मराठवाड्यामध्ये स्वतंत्र व्हावे असेही विचारमंथन होत असते . अन्यथा सत्तरी च्या दशकामध्ये जसे मराठवाडा विकासाचे तीव्र आंदोलन उभे राहिले होते तसे आंदोलन मराठवाड्यातील जनतेला पुन्हा करावे लागणार आहे.

**- डॉ. गोपाळ चौसाळकर, शिक्षणतज्ज्ञ,अंबाजोगाई.**



### विकासाला गती मिळावी...

मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी अनेकांनी लढा उभारला आणि अखेर मनोकामना पूर्ण झाली.निजाम राजवटीतून मूक्तता मिळाली.त्यामुळे येथील सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला. विकासाच्या कक्षा रुंदावतील अशी अशी अपेक्षा होती पण आज पर्यंत म्हणावा तसा विकास झाला नाही ही शोकांतिका आहे. राजकीय नेते मंडळी आपापली खुर्ची टिकवण्यासाठी आटापिटा करीत आहेत. समाजाच्या बाबतीत मात्र कृती शून्य असल्याचे दिसून येते. महागाई, बेरोजगारीने डोकेवर काढले आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे हे अमृतमहोत्सवी वर्षे साजरे होत असताना मात्र विकासाची चाके रूतलेली आहेत. त्यास या निमित्ताने जर गती मिळाली तर अमृतमहोत्सव साजरा केल्याचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. **- बाबुराव पाटील, ज्येष्ठ पत्रकार, भोकर जि.नांदेड**

### मराठवाड्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पंचसूत्री मिळावी...

मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढा अनेकांच्या त्याग, बलिदानातून उभा राहिला. हे बलिदान म्हणजे केवळ भक्तिभावाने उधळलेला भंडारा नव्हे, आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक विकासाची ती एक खूण आहे. ती युगानुयुगे मनात जपायला हवी. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या वेळी अर्थात १९४८ च्या दरम्यान शिक्षण क्षेत्रात मराठवाडा नेमका कुठे होता, आज कुठे आहे, याचा विचार करता गेल्या बहात्तर वर्षांत मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात समाधान, अभिमान वाटाव्यात अशा अनेक गोष्टी घडल्या आहेत. मराठवाड्यात १९१४-१५ च्या दरम्यान सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून औरंगाबाद येथे शाळा सुरू झाली. तीच गोष्ट उच्च शिक्षणाच्या बाबतीतही आहे. १८८५ मध्ये पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले, तर मराठवाडयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांतून औरंगाबाद येथे १९५० च्या दरम्यान 'मिलिंद' हे पहिले महाविद्यालय सुरू झाले. त्याच काळात नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ यांनी पीपल्स कॉलेजची स्थापना केली. थोडक्यात पश्चिम महाराष्ट्रच्या तुलनेत मराठवाड्यात शिक्षण पोचायला सत्तर ते पंचाहत्तर वर्ष उशीर झाला. दरवर्षी वैद्यकीय, अभियांत्रिकी शाखेत प्रवेश मिळविणाऱ्या यादीत शाहू महाविद्यालयाचा टक्का कायमच वाढता राहिला आहे. हे लातूर पॅटर्नचे यश नाकारता येत नाही किंवा लातूर पॅटर्नसारखा दुसरा एखादा पॅटर्न राज्यात कुठे सुरू झाला नाही.पूर्वी औरंगाबाद, जालना, लातूर, नांदेड आदी शहरे ही महाविद्यालयांच्या नावाने ओळखले जायचे. आता हीच शहरे कोचिंग क्लासच्या नावाने ओळखली जात आहेत. ही बाब मराठवाड्याला नक्कीच भूषणावह नाही. मराठवाड्यातील शिक्षण संस्थानी आपली उच्च माध्यमिक विद्यालय अधिक सक्षम करायला हवीत. लातूर पॅटर्नसारखी शिक्षणाचे बेट ही मराठवाड्यातील तालुक्या तालुक्यात उभी राहायला हवीत. सर्वांसाठी मोफत शिक्षण, विद्यार्थी केंद्री शिक्षण, आनंददायी शिक्षण, दर्जेदार शिक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण ही शिक्षणातील पंचसूत्री समोर ठेवून सरकारी व अनुदानित संस्थानी वाटचाल करायला हवी. **- डॉ.प्रवीण काळे, कवी-लेखक, माजलगाव जि. बीड**

### मराठवाड्यासाठी रोजगार निर्मितीचे स्वतंत्र धोरण ठरवा...

आज आपण पाहतो शिक्षण अति उच्च झाले आहे तरी अनेक तरुण सुशिक्षित रोजगाराविना भटकत आहेत. अगदी हाल अपेष्टा सहन करून आई वडील मुलांना शिकवतात पण हवे ते यश न मिळाल्याने निराशेने ग्रासलेले तरूण धड घर का न घाट का या अवस्थेत आपले जीवन व्यतीत करत आहेत. अनेक वर्षांपासून मराठवाडा मागासलेला आहे. हे मराठवाड्याचे मागासलेपण दूर करून येथे रोजगार निर्मिती झाली पाहीजे. मराठवाड्यात औद्योगिक विकास म्हणावा तसा झालेला नाही. मराठवाड्यातील अनेक तरुण रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबईकडे धाव घेतात ही खूप मोठी शोकांतीका आहे, औरंगाबाद जरी एमआयडीसी असली तरी कामगारांना योग्य रोजगार मिळतो का? कामगारांचा सर्वांगीण विकास होतो का? तर माझ्या दृष्टीने नाही. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक वसाहती निर्माण करायला हवी व हस्त कौशल्याला वाव देऊन युवक युवतींना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. शिक्षणावर अवलंबून न राहता रोजगार निर्मितीचा विचार प्रत्येक तरुण पिढीने करायला हवा तेव्हा कुठे रोजगार क्रांती होईल, असे वाटते.

**सौ. दुर्गा देशमाने राऊत.**
**कवयित्री, माजलगाव जि.बीड**

### मराठवाड्याचे नशीब पालटावे ही अपेक्षा...

१७ सप्टेंबर २०२३ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होत असली तरी मागील पंचाहत्तर वर्षांमध्ये विकासाच्या दृष्टीने मराठवाड्याच्या हाती काय आले, हा गांभीर्याने विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्त्वाखाली मराठवाड्यातील जनतेने दिलेली कडवी झुंज आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या निर्णायक कृतीमुळे हैदराबाद संस्थान विलीनीकरणाच्या प्रक्रियेत मराठवाडा निजामाच्या गुलामगिरीतून स्वतंत्र झाला खरा, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात पश्चिम महाराष्ट्राची साखर लॉबी सहकारात आणि सत्तेत सदैव अग्रेसर राहिल्यामुळे मराठवाडा सर्वच क्षेत्रात उपेक्षित राहिला. पुरेसा निधी मराठ्वाड्याच्या वाट्याला आलाच नाही. अनेक सामाजिक चळवळी पश्चिम महाराष्ट्रात जश्या फोफावल्या, तशा मराठवाड्यात वाढल्या नाहीत. त्यामुळे लोकशिक्षण, प्रबोधन, सामाजिक जागृती या सर्वच बाबतीत मराठवाडा मागासच राहिला. जायकवाडी धरणासारखा एखादा मोठा प्रकल्प दिसत असला तरी अनेक कारणांमुळे सिंचनाला मर्यादा पडल्या आहेत. वेरूळ अजिंठ्यासारख्या लेण्यांमुळे मराठवाड्याचे जगात नाव झाले. परंतु आजही पर्यटनासाठी आवश्यक सोयी सुविधांची वानवा आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार ३१ मे २०११ रोजी केळकर समितीचे गठन करण्यात आले आणि अभ्यासाअंती समितीने २०१३ साली महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील अहवाल सादर केला. पण केळकर समितीचा अहवाल मराठवाड्याचे नशीब पालटू शकला नाही. यासाठी मराठवाड्यातील जनतेनेच पुढे होऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे असे वाटते.

**- उद्धव भयवाळ, लेखक, छत्रपती संभाजीनगर**

### पाय ओढणे थांबवून विकासाला महत्त्व द्या...

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. भारत देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून बाहेर काढले. गुलामगिरीतून आणि वेगवेगळ्या जाचातून आपली सुटका झाली म्हणून लोकांनी भारतभर स्वातंत्र्याचा आनंदोत्सव साजरा केला. भारताला स्वातंत्र्य मिळाले ही गोष्ट जरी खरी असली तरी त्याचवेळी भारताचा काही भाग हैदराबाद संस्थानात होता. त्यामध्ये मराठवाड्याबरोबर कर्नाटक व तेलंगाना मधील काही जिल्ह्यांचा समावेश होता. चौदा जिल्ह्यांचे हैदराबाद संस्थान तयार झाले होते. निजाम राजवटीच्या सत्तेचे प्राबल्य मराठवाड्यावर बळकट होते . निजामी राजवटीने मराठवाड्यावर जवळ जवळ दोनशे पन्नास वर्ष राज्य केलेले दिसून येते. खरे तर आता स्वातंत्र्यानंतरही मराठवाड्याचे मागासलेपण दिसते आहे. त्यावेळी तर मराठवाडा निजामी राजवटीत किती मागासलेला असेल, किती दयनीय अवस्था असेल याची कल्पनाही करवत नाही. इथल्या माणसांची दयनीय अवस्था जाणून बुजून इथल्या व्यवस्थेने आणि निजामी राजवटीने केली होती. मराठवाडा हा निजामाच्या तावडीतून मुक्त व्हावा, इथल्या जनतेला स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेकांनी लढे दिले व लढे उभा केले. हा लढा १७ सप्टेंबर १९४८ रोजी संपला आणि मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. पण आजही मराठवाड्यात औद्योगिक, रोजगार, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सिंचन, सामाजिक, कृषी, पर्यटन आणि इतर महत्वपूर्ण क्षेत्रात मनावर तेवढा विकास झालेला दिसत नाही. राजकारणही संकुचित आणि स्वार्थी वृत्तीने केले जाते. तेही एकमेकांची पाय ओढण्यामध्ये गुंग असतात. त्यामुळे विकासाकडे त्यांचे लक्ष दिसत नाही.

**- प्रा. डॉ. सतीश मस्के, साहित्यिक, भाटुंबा ता. केज जि.बीड**

### मराठवाड्याचे मागासपण द्रुतगतीने

महाराष्ट्राच्या तीन प्रमुख विभागांत मराठवाडा सर्वच विकास क्षेत्रांत अधिक मागासलेला, कृषीप्रधान, अवर्षणप्रवण आणि अतिपाणी तुटीचा प्रदेश आहे. केळकर समितीच्या अहवालांतील २०१०च्या आकडेवारीनुसार, राज्याच्या प्रगत अशा उर्वरीत प्रदेशाच्या तुलनेत विविध क्षेत्रांतील हे मागासपण १० ते ९८ टक्क्यांपर्यंत आहे. मागील नऊ-दहा वर्षांत ही टक्केवारी विकास निधीच्या असमन्यायी वाटपामुळे फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सिंचनासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात प्रत्यक्ष अनुशेषाचा विचार न करता, दहा वर्षांपासून मराठवाड्याला अनुशेष निर्मूलन निधी नाकारला जात आहे. नागपूर करारानुसार, विकासनिधीचे वाटप किमान लोकसंख्येच्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. १९६०मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठवाड्याला झुकते माप देण्याच्या आश्वासनाचा शासनाला पूर्णपणे विसरच पडला आहे. त्यामुळे मराठवाड्याचे मागासपण द्रुतगतीने वाढत असून, अशीच परिस्थिती चालू राहिली तर मराठवाडा, प्रत्येकबाबतीत दुय्यम दर्जाच्या नागरिकांचा, मजुरांच्या वसाहतीचा व आत्महत्या करीत राहणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रदेश बनून राहील. **शाहीर माधव बैलकवाड, नायगाव, जि. नांदेड**

# 'सी २९५' भारताकडे सुपूर्द

आधुनिक केसरी

'एअरबस डिफेन्स अँड स्पेस कंपनी'ने भारतीय हवाई दलाकडे (आयएएफ) पहिले 'सी २९५' हे वाहतूक विमान सुपूर्द केले. भारतीय हवाई दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने २१ हजार ९३५ कोटींना ५६ 'सी २९५' वाहतूक विमाने खरेदी करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी 'एअरबस डिफेन्स अँड स्पेस कंपनी'बरोबर करार केला होता. बुधवारी स्पेनमधील सेव्हिल शहरात एअरबस कंपनीच्या उत्पादन प्रकल्पात आयोजित कार्यक्रमात भारतीय हवाई दल प्रमुख व्ही. आर. चौधरी यांना हे विमान सुपूर्द करण्यात आले. या करारानुसार 'एअरबस' २०२५ पर्यंत सेव्हिल शहरातील उत्पादन प्रकल्पातून भारताला सुसज्ज स्थितीतील १६ 'सी २९५' विमाने पुरवणार आहे. उर्वरित ४० विमाने नंतर दोन्ही कंपन्यांतील औद्योगिक भागीदारी कराराचा भाग म्हणून 'टाटा अॅडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड'द्वारे (टीएएसएल) भारतात उत्पादित करून त्यांची बांधणी (असेम्बल) केली जाईल. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बडोदा येथे या विमानांच्या निर्मिती सुविधेची पायाभरणी केली होती. खासगी कंपनीद्वारे भारतात बनवले जाणारे हे पहिले लष्करी विमान असेल. भारतीय हवाई दल साठ वर्षांपूर्वी सेवेत दाखल केलेल्या 'एव्हरो-७४८' या जुन्या विमानांचा ताफा बदलून ही 'सी२९५' विमाने खरेदी करत आहे. 'सी२९५' हे एक अद्ययावत वाहतूक विमान मानले जाते. त्यातून ७१ सैनिक अथवा ५० 'पॅराशूटर'ची वाहतूक युद्ध अथवा आणीबाणीच्या काळात करता येऊ शकते. याशिवाय ज्या ठिकाणी सध्याची अवजड विमाने पोहोचू शकत नाहीत अशा दुर्गम ठिकाणी लष्करी उपकरणे आणि रसद पुरवठा करण्यासाठी याचा वापर केला जातो. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पीडित अथवा आजारी नागरिकांना तातडीने हलवण्यासाठीही या विमानांचा उपयोग होऊ शकतो. हे विमान विशेष मोहिमांशिवाय आपत्तीच्या-आणीबाणीच्या स्थितीत सागरीत किनाऱ्याच्या भागात गस्त घालू शकते. गेल्या वर्षी या करारावर स्वाक्षरी केल्यानंतर, एअरबसने सांगितले की कंपनी आपल्या भारतीय औद्योगिक भागीदारांच्या सहकार्याने जागतिक दर्जाचे विमान उत्पादन आणि देखभाल सुविधा भारतात आणेल. भारतासाठी तयार करण्यात आलेल्या पहिल्या 'सी २९५' विमानाने मे महिन्यात सेव्हिल येथे आपले पहिले यशस्वी उड्डाण केले. दुसरे विमान सेव्हिल येथील उत्पादन प्रकल्पात बांधणीच्या अंतिम टप्प्यात असून, पुढील वर्षी मेमध्ये ते भारतीय हवाई दलाकडे सुपूर्द केले जाणार आहे. भारतीय हवाई दलातील सहा वैमानिक आणि २० तंत्रज्ञांनी सेव्हिल येथे आधीच दीर्घ प्रशिक्षण घेतले आहे. बडोदा येथे 'सी २९५' विमानाचे उत्पादन आणि उत्पादन प्रकल्प पुढील वर्षी नोव्हेंबरमध्ये सुरू होणार आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जगात भारतीय हवाई दलाकडे सर्वाधिक 'सी २९५' विमाने असतील.

# 'त्या' महाविद्यालयांवर कार्यवाही का नको ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**देशाच्या शिक्षण क्षेत्रात गुणात्मक मुल्यांकन करण्यासाठी युजीसीच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर ज्याला नॅक मुल्यांकन म्हणुन स्वतंत्र एजन्सी काम करते. तीन वर्षाआड महाविद्यालयाने सामोरे जावुन मुल्यांकन करून घेणे महत्वाचे. असे असताना राज्यात पन्नास टक्के देखील महाविद्यालये स्वत:चं मुल्यांकन करून घेण्यासाठी पुढे येत नाहीत?त्याचं कारण कळत नसलं तरी केवळ आर्थिक लाभापोटी संस्था चालवायच्या आणि गुणवत्तेचे कोंबडं झाकुन ठेवायचं परिणामी काही उघडं पडेल म्हणुन तोंड लपवत बसायचं या भुमिकेत महाविद्यालय चालवणारे संस्थाचालकाची भुमिका दिसते. पण आता राज्य सरकारच्या उच्च शिक्षण विभागाने कठोर भुमिका घेताना असे महाविद्यालय जे नॅककडून मुल्यांकन करून घेत नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी परिणामी विद्यापीठाकडून संलग्नता रद्द करावी आणि हे जर नाही केलं तर नविन शैक्षणिक धोरण कितीही कठोर परिवर्तनशील राबवायचं ठरवलं तरी अशा अव्यवस्थेमुळे अडथळे निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाहीत.**

महाविद्यालयाचे ऑडीट करण्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून झालेला निर्णय कौतुकास्पद म्हणावा लागेल. पण हे करताना विद्यापीठ व्यवस्थापनाच्या दुर्लक्षित मनमानी कारभारावर गुणवत्तेच्या दृष्टीने अंकुश मात्र ठेवावाच लागेल. सुसंस्कृत समाज निर्मिती नव्हे तर देशाच्या उभारणीत शिक्षण क्षेत्राची फार मोठी जबाबदारी महत्वाची वाटते. त्यामुळे व्यवस्था चालवणार्यांनी या क्षेत्रात पारदर्शक गुणात्मक काम करणे महत्वाचे. वर्षानुवर्षे सत्ता चालवणार्यांनी शिक्षण क्षेत्राला भ्रष्टाचाराचं कुरणच बनवलं. त्यामुळे विद्यापीठ असो किंवा संस्थाचालक असो गुणवत्तेच्या दृष्टीने चौकस आणि सखोल कारभाराचा अभाव प्रत्येक ठिकाणी दिसतो. संपुर्ण देशात महाविद्यालय अकरा हजार पेक्षा अधिक संख्येने आहेत असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही. या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर काम करणारी युजीसी नावाची एजन्सी असुन गुणवत्तेच्या दृष्टीने आणि भौतिक देखभालीचं काम महाविद्यालय स्तरावर त्यांच्याकडून केल्या जातं. गंमत बघा, आमचं मुल्यांकन करा अशा प्रकारची मागणी महाविद्यालयाकडून युजीसीला केली जाते. याचा अर्थ आम्ही गुणवत्ता आणि भौतिक सुविधेच्या दृष्टीने सक्षम आहोत का नाहीत ?याची तुम्ही परीक्षा घ्या असा होवु शकतो. पण दुर्दैव यासाठी म्हणावे लागेल की देशात पन्नास टक्यापेक्षा अधिक संख्येने मूल्यांकन करण्यासाठी ना संस्थाचालक पुढे येतात ना महाविद्यालय पुढे येतात. प्रश्न हाच महाराष्ट्रात देखील गंभीर होवुन बसलेला आहे. कारण कधी काळी सत्ता चालवणार्यांनी या क्षेत्राला भ्रष्टाचाराचं कुरण बनवलेलं असुन जेव्हा काही परिवर्तन आणि पारदर्शक कारभार करणारी व्यवस्था बदलत रहाते त्यावेळी मात्र सामान्य लोकांच्या अपेक्षा त्यांच्याकडून असतात. राज्यात भाजपचं सरकार आल्यानंतरच अशा अपेक्षा का ? त्याचं उत्तर देखील समर्पक असुन हे बदल आणि गुणात्मक तत्वाचा स्विकार केवळ भाजप विचाराची मंडळी करू शकते हा अनुभव आता लोकांनासुद्धा वाटतो. मुळ विषयाला धरून चालायचं झालं तर शिंदे-फडणवीस-पवार सरकारने अर्थात राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणुन काम करतात. त्यांनी गुणात्मक बदल स्विकारत असताना सर्व महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकिय लेखापरीक्षण ऑडीट करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी समिती गठीत करण्यात आली असुन काही तज्ञ पॅनल तयार केले. ज्यामुळे महाविद्यालय चालवण्यावर अधिक नियंत्रण येवु शकते. खरं तर विद्यापीठ कायद्यामध्ये महाविद्यालयाचे दर तीन वर्षानी शैक्षणिक आणि प्रशासकिय लेखा परीक्षण करण्याची तरतुद करून ठेवलेली आहे. पण विद्यापीठ चालवणार्या व्यवस्था याकडे पुर्णतः डोळेझाक करतात. वास्तविक पहाता विद्यापीठाच्या कुलगुरूवर सर्वस्वी जबाबदारी जाते पण त्यांच्याच भुमिकेत निष्क्रियता जेव्हा भरलेली असते तेव्हा वेगवेगळे उपक्रम घेण्यासाठी अभाव निर्माण होतो.कागदोपत्री मुल्यांकन करायचं आणि मग ग्रेड देवुन टाकायचे.मध्यंतरी एका विद्यापीठात यावर बराच खल झाला होता. एक गोष्ट खरी आहे की, शिक्षण क्षेत्र चालवणार्यांच्या भुमिकेतच कमालीची गुणवत्ता आणि पारदर्शकता असणे महत्वाचे वाटते.

**मुल्यांकन का टाळतात ?**

खरं तर महाविद्यालयाचं मुल्यांकन नॅककडून करून घेणं ही जबाबदारी संस्था चालकांची त्यानंतर संबंधित विभाग आणि सरकारची पण असते. मध्यंतरी एका महाविद्यालयाचं मुल्यांकन करण्यासाठी समिती आली होती. त्यातल्या एका वरिष्ठाने सांगितलं की देशात पन्नास टक्के मुल्यांकन करून घेण्यासाठी महाविद्यालय पुढे येत नाहीत. अत्यंत दुर्दैव असुन या प्रश्नावर राज्य आणि केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने



कठोर भुमिका घ्यायला हवी. जे महाविद्यालय नॅक मुल्यांकन करत नाहीत त्यांची मान्यता रद्द करणं यासाठी कठोर बदल करावे लागतील. पण मुल्यांकन का टाळतात ? या प्रश्नाचा शोध जेव्हा घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा लक्षात आलेली गंभीर गोष्ट म्हणजे राज्यात बहुतेक शिक्षण संस्थाचालकाचे महाविद्यालय केवळ इमारतीच्या कागदावर चालतात, प्राध्यापक आणि कर्मचार्यांची भरती, त्यांचे पगार सर्व नियमित आणि वेळेवर पण महाविद्यालय बंद मग अशा महाविद्यालयाची मान्यता सरकार का काढून घेत नाही ? त्यापेक्षा जिथे महाविद्यालय ते चालते का नाही ? याची चौकशी आणि पहाणी करणे महत्वाचे. बाकी काही असलं तरी राज्याच्या उच्च तंत्र विभागाने महाविद्यालय तपासणीचा घेतलेला निर्णय येणार्या काळात लाभदायक ठरेल. त्याची अंमलबजावणी कितपत योग्य पद्धतीने होते तो भाग वेगळा. पण एक गोष्ट खरी आहे की युजीसीकडून महाविद्यालयाचं नॅक मुल्यांकन करूनच घेतलं पाहिजे. त्यासाठी विद्यापीठाने कठोर पावले उचलणे महत्वाचे आणि जे महाविद्यालय पुढे येत नाहीत त्यांची विद्यापीठ संलग्नता रद्द करायला हवी हे तितकंच खरं. नॅक मुल्यांकन म्हणजे एखाद्या माणसाने चांगल्या रूग्णालयात जावुन आपल्या शरीराची सर्व तपासणी अर्थात ऑडीट करणं महत्वाचं यापेक्षा दुसरं उदाहरण इथे लागु पडतच नाही. कारण सर्वंकष तपासणी सदृढ शरीर तसंच नॅक म्हणावे लागेल. महाविद्यालय त्यातल्या सुविधा, वेगवेगळ्या विभागाची गुणवत्ता, समाजाचं दायित्व, विद्यार्थी घडवणं, मैदान, व्यायाम, संगीत, आरोग्य शिवाय लोक भावना त्या महाविद्यालयाच्या प्रती असणं. या सार्या गोष्टीचा सर्वंकष निरिक्षण म्हणजे नॅक मुल्यांकन होय आणि त्यात जर महाविद्यालय पास झाले तर मिळणार्या ग्रेड आधारे राष्ट्रीय पातळीवर काम करणार्या वेगवेगळ्या एजन्सीकडून महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळु शकतो. मग त्या महाविद्यालयाचा सर्वांग विकास होण्यास मदत होते. अर्थात हे सारं शिक्षण संस्था चालकाच्या भुमिकेशी निगडित आहे. स्वतः शिक्षण संस्था चालकांनी देखील आपण चालवत असलेल्या शाळा, महाविद्यालयावर गुणात्मकदृष्ट्या विशेष लक्ष्य घातले. त्याचा फायदा निश्चित शिक्षण क्षेत्राच्या सर्वांग प्रगतीसाठी झाल्याशिवाय रहाणार नाही. पण संस्था चालकच जर उदासिन असतील तर अशा वेळी नाठाळाच्या माथी बसल्याशिवाय रहाणार नाही काठी.

# गणेशोत्सवात विधायक कामे करावीत



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृती ची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली.**

आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी, असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी



तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा-मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. रक्तदान शिबिर, दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# भाजप सहमुख्य प्रवक्ते अजित चव्हाण महाराष्ट्र प्रदेश भाजप बुद्धिजीवी प्रकोष्ठ संयोजकपदी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** भारतीय जनता पक्षाचे सहमुख्य प्रवक्ते अजित चव्हाण यांची महाराष्ट्र प्रदेश भाजप बुद्धिजीवी प्रकोष्ठ संयोजकपदी निवड झाल्याचे पत्र भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले त्यांच्या या निवडीबद्दल अजित चव्हाण यांनी महाराष्ट्राचे उपमुख्मंत्री देवेंद्र जी फडणवीस व प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच प्रदेश पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहे.

काल भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माननीय श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी अजित चव्हाण यांना नियुक्तीचे पत्र देऊन अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. यावेळी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते माधव भंडारी, सरचिटणीस विजय चौधरी सरचिटणीस माधवी नाईक जी वैद्यकीय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अजित गोपछडे जी यावेळी उपस्थित होते अनेक वर्ष आघाडीच्या वृत्तवाहिन्यांमधून वृत्त निवेदक संपादक राहिलेल्या पत्रकारिता क्षेत्रात दोन दशकाहुन अधिक काळ आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या अजित चव्हाण यांचा राज्यामधल्या विविध क्षेत्रातील प्रज्ञावंतांशी निकटचा संबंध असल्याने पक्षातील मानाच्या बुद्धिजीवी प्रकोष्ठाच्या प्रदेश संयोजक (प्रदेशाध्यक्ष) पदाची जबाबदारी देण्यात आल्याचे सांगण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अजित चव्हाण यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# इटियाडोह धरण 'ओव्हर फ्लो'च्या उंबरठ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गेल्या पाच दिवसांपासून जिल्ह्यात अधूनमधून पाऊस येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता कमी झाली आहे. जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण मोठे असल्यामुळे जंगलांतून येणारे पाणी जलाशयांत जमा होत आहे. त्यामुळेच अर्जुनी मोरगाव तालुक्यातील इटियाडोह धरणातील पाणी साठ्यात वाढ होत आहे. गुरुवारी ९५.४९ टक्के पाणीसाठा झाला. गुरुवारी दुपारी ४ वाजतापासून जिल्ह्यात पावसाने दमदार पुनरागमन केले. त्यामुळे येत्या काही तासांत धरण ओव्हरफ्लो होण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाने वर्तविली आहे. यावर्षी पावसाने शेतकऱ्यांना चांगलेच मेटाकुटीस आणले. पावसाच्या अपुरेपणामुळे धान पिकावर त्याचा परिणाम झाला. ऑगस्ट महिन्याच्या शेवट्च्या आठवड्यात पावसाची नितांत गरज होती. मात्र, पाऊस झाला नाही. तब्बल १५ दिवसांपेक्षा जास्त काळ पावसाने दड़ी मारली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक जगविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यातच आता गेल्या पाच दिवसांपासून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी बरसत आहेत. काही ठिकाणी दमदार पावसाच्या सरी बसरल्या. त्यामुळे बांध्यांमध्ये पाणी साचले. नद्या आणि नाले देखील प्रवाहित झाले आहेत. धरणांतील पाणी साठ्यात वाढ होऊ लागली आहे. सततच्या पावसामुळे इटियाडोह धरण गुरुवारी सकाळी ९५.४९ टक्के भरले.

# धर्माबादेत राजकीय पक्षांकडून संघटना बांधणीस प्राधान्य

## भाजप आणि काँग्रेसकडून पदाधिकाऱ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आगामी काळातील लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लक्षात घेता फुटलेले गट आणि भाजप, काँग्रेस पक्षांकडून संघटना बांधणीस प्राधान्य दिले जात आहे. याचाच एक भाग म्हणून युवक काँग्रेसच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदी बंडू पा. नरवाडे, शहर उपाध्यक्ष शंकर बोलमवाड, भाजपच्या तालुका अध्यक्षपदी विजय डांगे, युवा मोर्चा आघाडीच्या शहर अध्यक्षपदी सतीश मोटकूल यांची वर्णी लागली आहे. केंद्र व राज्यात भारतीय जनता पक्ष सत्तेत असल्यामुळे या पक्षाच्या तालुका अध्यक्षपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडते? याविषयी फार चुरस निर्माण झाली होती. अर्धशतकापेक्षा अधिक लोकांनी मुलाखती दिल्या होत्या. त्यात खासदार आणि आमदारांनी आपल्याच मर्जीतील व्यक्ती तालुका अध्यक्ष राहावी यासाठी आपली शक्ती पणाला लावली होती. मात्र शेवटी माजी तालुका प्रमुख विजय पा. डांगे यांचीच निवड झाल्यामुळे आमदार खासदारांना भारी पडल्याची चर्चा रंगात आली आहे. शहरातील राजकारणात खासदार गट प्रभावशाली होता. मात्र त्यास कात्री लावण्यास सुरवात बोलले जात आहे. कारण तालुका अध्यक्षानी आपली निवड होताच सतीश मोटकूल यांना युवा मोर्चाच्या शहराध्यक्ष पदी त्यांची नियुक्ती केली आहे.खासदार गटाचा मात्र या निवडीनेहिरमोड झाला असून सांगता ही येत नाही आणि लपवीता ही येत नाही अशी त्यांची अवस्था झाली आहे. अशोकराव चव्हाण हे धर्माबादच्या दौऱ्यावर आले तेंव्हा काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले बंडू नरवाडे यांची काँग्रेसच्या युवक आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती केली आहे.तर धर्माबाद शहर उपाध्यक्ष म्हणून माजी नगरसेवक शंकर बोलमवाड यांची निवड केली आहे. धर्माबादमध्ये कॉंगेस,भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना या चार ही पक्षांचे प्राबल्य असून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर त्यांचे थेट पडसाद तालुक्याच्या राजकारणावर पडलेले आहेत.माजी जिल्हा परिषद उपाध्यक्षाचे पुत्र आणि शिवसेनेचे तालुका प्रमुख आकाश रेड्डी यांनी व्हाया हेमंत पाटील शिंदे गटात गेल्यामुळे सेनेत उभी फूट पडली.सुरेंद्र बेळकोणीकर यांनी सेनेला जय महाराष्ट्र केल्यापासून शहरातील निवडणुकीच्या राजकारणात सेनेचे अस्तित्व नाम मात्र स्वरूपात उरले होते.मात्र ग्रामीण राजकारणात आकाश रेड्डी यांच्या रूपाने जिल्हा परिषद सदस्य आणि मारोती कागेरू प. समिती सदस्य मिळाले होते. परंतु आकाश रेड्डी यांनी शिंदे गटात गेल्यामुळे सेनेच्या ग्रामीण राजकारणातील अस्तित्वापुढे प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहेत. राष्ट्रवादी कॉंगेसची स्थितीही काही वेगळी नसून माजी आमदार बापूसाहेब गोरठेकर यांचा झालेला मृत्यू, राष्ट्रवादीत निर्माण झालेले दोन गट आणि त्यात विनायकराव कुलकर्णी आणि जयंत पाटील यांच्यात नसलेले सख्य यामुळे राष्ट्रवादीत फूट पडताच विनायकराव कुलकर्णी यांनी आपल्या समर्थकांसह मुंबई गाठत अजित पवारांना समर्थन दिलेले आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत ही स्पष्ट दोन गट आहेत. काँग्रेस पक्षातही कवळे गुरुजी आणि रविंद्र चव्हाण यांच्यात भावी आमदार होण्यासाठी रस्सीखेच असली तरी शहरातील काँग्रेसमध्ये हा संघर्ष सुप्त स्वरूपात आहे. वंचित बहुजन आघाडी, बीआरएस, भाजप, काँग्रेससह सर्वच गटानी आणि पक्षांनी संघटना बांधणीवर आपले लक्ष केंद्रित केले असले तरी सर्वांनाच गटबाजीने पोखरले आहे. येणाऱ्या निवडणुका महायुती आणि महाविकास आघाडीयांच्यात सरळ लढती होणार असल्यातरी हे नाराज गट कोणाच्या बाजूने आपली छुपी रसद कोणाला पुरवितो यावरच निवडणुकीच्या निकालांचे भविष्य अवलंबुन असेल.

# गोंदियात मुसळधार पाऊस; रस्ते बंद

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यात गेल्या पाच दिवसांपासून अधून मधून पाऊस पडत होता. मात्र गुरुवारी सायंकाळी ४ बैलपोळा एन भरात असताना सुरू झालेला पाऊस रात्र भर बरसला आणि शुक्रवारी पहाटे पासून तर चक्क मुसळधार पावसाला सुरुवात झाली ती सकाळी ११ वाजता पर्यंत सातत्याने वाढत तर काहीशी ओसरत पाऊस सुरूच राहिला.

आज बरसलेल्या मुसळधार पावसामुळे गोंदिया जिल्ह्यासह शहरात ठिकठिकाणाहून निघणाऱ्या मारबत आणि बडग्यांची मिरवणुकीच्या उत्साहावर विरजण पडले. काही अती उत्साही तरुणांनी पाऊस ओसरत नसल्याचे पाहून मारबत लाच रेनकोट घालून मिरवणूक काढली. स्वतः हातात छत्री घेऊन काही ठिकाणी औपचारिक मिरवणूक काढण्यात आली. पण त्यात उत्साह दिसून आला नाही. ठिकठिकाण ची मिरवणूक बघण्याकरिता आजच्या दिवशी पुरुषवर्ग दुपार पर्यंत चा वेळ बाहेर घालवतात पण पहाटे पासूनच सुरु असलेल्या मुसळधार पावसाने आज घराबाहेर पडू दिले असल्यामुळे अनेकांचा हिरमोड झाला.

शुक्रवारी मध्यरात्री आणि पहाटे पासूनच सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात ठिकठिकाणी पाऊसाचे पाणी साचलेले होते. गोंदिया शहरातून वाहणारी पांगोली नदी दुथडी भरुन वाहत असल्यामुळे गोंदिया आमगाव मार्ग बंद करण्यात आले आहे. नदीवरील पाणी ओसरल्यानंतर मार्ग पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे सहायक आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी बोलताना सांगितले.




महाराष्ट्र Business Katta













# आरक्षणाचा तिढा सोडवण्याची सरकारला सुवर्णसंधी

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३१

महाराष्ट्र राज्याचे सरकार मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे अडचणीत आले आहे, असे म्हणता येईल का ?अडचणीत आले आहे.... यासाठी म्हणता येईल की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिलेला होता; परंतु राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी अगदी पोळा सणाच्या दिवशी आंतरवाली सराटी येथे येऊन उपोषणकर्ते मनोज जरांगे यांची भेट घेतली. महाराष्ट्र सरकार या आरक्षणाबाबत किती गांभीर्याने विचार करत आहे हे त्यांनी त्याठिकाणी केलेल्या भाषणातून दाखवून दिले. या आरक्षणाची तरतूद कशी करता येईल या प्रक्रियेसाठी सरकारने जस्टीस कमिटी स्थापन केली आहे. असे सांगून म्हणाले की, आरक्षणाचा प्रश्न आपण कायम स्वरूपी मार्गी लावणार आहे; परंतु हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यावर अनेक तज्ज्ञ मंडळी काम करत आहेत. मराठा आरक्षण हे कायम टिकून कसे राहील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, अशा प्रकारचा सकारात्मक संवाद गावकऱ्यांच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांच्या सोबत झाला. यावर मनोज जरांगे यांनीही मुख्यमंत्री साहेबांना अजून दहा दिवसांचा कालावधी वाढवून दिला. आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी या सरकारला असाही इशारा दिला होता की, ३० व्या दिवसापर्यंत आरक्षण नाही मिळाले तर ३१ व्या दिवशी राज्यातील एकाही मंत्र्याला महाराष्ट्राच्या सीमेवर फिरकू देणार नाही. हा आरक्षणाचा मुद्दा मार्गी न लागल्यास पुन्हा एकदा उपोषण सुरु करणार असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले होते. आधुनिक केसरी वृत्तपत्रातील बातमीत असे लिहिले आहे की, आजपासून सरकारला एक महिन्याचा वेळ दिला आहे. या एक महिन्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम करावे अन्यथा पुढच्या १२ तारखेला म्हणजेच १२ ऑक्टोबरला मराठा समाजाची मोठी सभा होईल. या सभेत राज्यातील प्रत्येक मराठा सहभागी होईल. देशाच्या इतिहासात कधी नव्हे अशी ही सभा होईल. मराठ्यांचा आक्रोश यानिमित्ताने जगाला पहायला मिळेल. या वक्तव्याचा परिणाम म्हणून की, काय मुख्यमंत्री साहेबांनी ऐन पोळ्याच्या दिवशी भेट घेऊन आंदोलनकर्त्यांना दिलासा दिला आहे.

या मागणीच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र राज्य सरकार मराठा आरक्षणाला कशाप्रकारे सामोरे जाईल व नेमकी काय भूमिका घेईल हे ऑक्टोबरच्या येणाऱ्या १२ तारखेपर्यंत कळेलच !

महाराष्ट्र सरकारने एकीकडे मराठा आरक्षणाच्या तडजोडीसाठी एका महिन्याचा कालावधी मागीतला आहे. मराठा समाजाची आरक्षणाची मागणी ओबीसीमधून आहे. मराठा समाजास कुणबी म्हणून ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण देता येते, कारण "कुणबी" ही ओबीसी प्रवर्गात समाविष्ठ असलेली जात आहे व ती सध्या विदर्भात कुणबी म्हणून शासनाच्या आरक्षणाचे फायदे घेते.

खरेतर जाती ह्या व्यवसायावरून पडल्या आहेत. शेती करणारा वर्ग म्हणजे शेतकरी; त्याला कुळंबी म्हणतात ( संदर्भ- मराठी शब्द रत्नाकर - वा.गो.आपटे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, आ.पुनर्मुद्रण १९९१ पृ.११० )

शेतकऱ्यांचे शेती करण्याचे जे मुख्य साधन आहे ते आहे "वखर" या वखराला "कुळव" म्हणतात. ( संदर्भ- मराठी शब्द रत्नाकर- ले.वा.गो.आपटे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, आ.पुनर्मुद्रण १९९१ पृ.११० )
"कुळव"पासून "कुळवणी' किंवा "कोळपणी" हाही शब्द तयार झालेला आहे. तर "कुळव' चा अपभ्रंश कुळंब व त्या कुळंब ने काम करणारा कुळंबी व या कुळंबीचा अपभ्रंश कुणबी असा होत गेला. म्हणून कुळव पासून कुणबी या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे.. महात्मा फुले यांच्या समग्र वाङ्मयात शेतकऱ्यांसाठी कुळंबी व कुळंबीण असे शब्द आलेले आहेत. म्हणून शेती करणारी जात कोणती असेल तर ती आहे कुणबी. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातही "कुणबी" शब्द आलेला आहे. तुकाराम महाराज म्हणतात, "बरे झाले देवा कुणबी केलो | नसता दंभेची असतो मेलो ||" या अभंगात "कुणबी" हा शब्द पुरावा म्हणून सांपडतो. कुणबी या शब्दाचा विस्तार आणि उत्पत्ती सांगता येते; परंतु मराठा हे जातीवाचक नाव नसून प्रांतवाचक असल्याचे दिसून येते.
राष्ट्रगीतांमध्ये प्रांताची नावे आलेली आहेत... पंजाब, सिंध, गुजरात, मराठा ( महाराष्ट्र ) द्रविड, उत्कल ( ओरिसा ) बंग ( बंगाल ) ही त्या त्या प्रांताची भाषा आहे. पंजाबी बोलणारे लोक ते पंजाब प्रांताचे, बंगाली भाषा बोलणारे बंगालचे. गुजराती बोलणारे गुजरात प्रांताचे. मराठी बोलणारे महाराष्ट्र प्रांताचे. म्हणून ज्यांना मराठी भाषा समजते व बोलता येते ते ते सर्व मराठी भाषिक म्हणजे मराठा. म्हणून "मराठा" ही जात नसून ते महाराष्ट्र प्रांताचे संबोधन आहे. कालांतराने मराठा हा शब्द कधी जात म्हणून वापरला गेला हे सांगणे कठीण आहे ; परंतु पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्रविड, उत्कल, बंग. अशा प्रकारची ही संबोधने आहेत. "मराठा तितुका मेळवावा | महाराष्ट्र धर्म वाढवावा.|| हा विचारही सकल मराठी बोलणाऱ्या मराठी भाषिक जनतेसाठी वापरल्याचे दिसून येते.

याचबरोबर महात्मा फुले यांनी लिहिलेल्या समग्र वाङ्मयातील "कुळंबी" हा पुरावा १८५० च्या सुमारातील आहे, तर संत तुकाराम महाराजांच्या अभंगात येणाऱ्या "कुणबी" या शब्दाचा पुरावा १६ व्या शतकातील आहे. याच शब्दाचे मूळरूप म्हणजे "कुळवाड" म्हणजे शेतकी, वतन, कुळवाडी म्हणजे शेतकऱ्यांचे वतन जिथे शेतीचा धंदा केला जातो ती जागा. कुळवाडी... म्हणून "कुळवाडीभूषण" हा शब्द महात्मा जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या पोवाड्यात आला आहे. म्हणून पूर्वी हजार पाचशे एकर शेती असणारा हा वर्ग आजचा मराठा कुणबीच होता; मात्र अलिकडे या कुणबी समुहाकडे शेती राहिलेली नाही. अनेक पिढ्यांमध्ये तिचे विभाजन होत जाऊन अधिक संख्येने आजचा मराठा कुणबी काहीप्रमाणात अल्पभूधारक तर काही भूमीहीन झालेला आहे. खेड्यातील आजच्या बहुतांश मराठी कुणबी समाजाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. म्हणून येणाऱ्या पिढीला आपली आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी मराठा समाजाचा समावेश इतर मागासवर्गीय प्रवर्गात करण्यात यावा, ही मागणी अनेक वर्षापासून जोर धरत आहे. परंतु या आंदोलनातून संपूर्ण मराठा समाजास सरसकट "कुणबी" प्रमाणपत्र देण्याची मागणी समोर आली आहे. असे झाल्यास मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा फायदा घेऊन प्रगती करता येईल. असा विधायक विचार या मराठा आरक्षण आंदोलनाचा आहे. दिवसेंदिवस उद्भवणाऱ्या कठीण परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मराठा समाज आरक्षण मागत आहे यामध्ये गैर काहीच नाही;
मराठा कुणबी म्हणून ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यात यावा. असा रास्त आग्रह धरणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे व मराठा समाजातील तरूण आंदोलक ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे म्हणून आक्रमक झाले आहेत. राज्यात एकीकडे मराठा समाजास ओबीसीमधूनच आरक्षण देण्याचा मुद्दा गाजत असताना अनेक ओबीसी नेते विरोध करताना दिसत आहेत. धनगर समाजाचे नेतेही विरोध करतांना दिसताहेत. परंतु मराठा तरूण सध्या आरक्षणाच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाकांक्षी झाला आहे. अनेक तरूण आंतरवाली




सराटी येथील उपोषणकर्ते मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देत आहेत. ते स्वतःही उपोषण करत आहेत. हजारो कार्यकर्ते आरक्षणासाठी जीवाची बाजी लावत आहेत. अनेक दिग्गज नेत्यांच्या नाकर्तेपणावर तरूण पिढी रोष व्यक्त करत आहेत; कारण या काळात "वेगवेगळ्या नेत्यांनी वेगवेगळी विधाने केली आहेत. काही नेत्यांच्या विधानावर तरुण मराठा कार्यकर्ते अत्यंत नाराज आहेत. काहीं तरुणांनी तर मराठा समाजातील मोठ्या नेत्यांनाच दोषी ठरवले आहे...मोठ्या नेत्यांना दोषी ठरविण्यातही तथ्य नसेल कशावरून...? परतूर येथील संभाजी ब्रिगेडचे परतूर तालुक्याचे आघाडीचे कार्यकर्ते आमचे स्नेही प्रा.डॉ.पांडुरंग नवल सरांनी टाकलेल्या एका फेसबुक पोस्टवर व्यक्त होतांना आमचे पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते शिवश्री एकनाथराव कदम यांनी न राहवून मराठा समाजातील नेत्यांबाबत खालील उद्गार काढले आहेत ते म्हणतात, " मराठा समाजातील आजी-माजी आमदार- खासदार, मंत्री-मुख्यमंत्र्यांनो ...तुमच्यापैकी काहीजण सोन्याचा चमचा घेऊन जन्मले. काहीजण गरिबी असतांनाही राजकीय संघर्ष करून पुढच्या ७ पिढ्यांनाही सरता सरणार नाही एव्हढं कमावून बसले. तुमच्याकडं असलेल्या सत्ता-संपत्तीकडे पाहून सगळा समाजच श्रीमंत आहे, हा इतर समाजातील लोकांचा गैरसमज झाला आहे.

तुमच्या गरिबीत तुम्हाला तुमच्या गरीब सोयऱ्या-धायऱ्यांनीच साथ दिली हे विसरू नका. निवडणूकीत प्रचाराला गावात आल्यावर घरात फुटके कप असल्यामुळं तुम्हाला शेजाऱ्यांच्या कपबशीतून चहा पाजला. तुम्ही मोठे झाल्यावर आमच्या पुढच्या पिढीत फुटके कप जाऊन नवीन कपबश्या आणण्याचं बळं येईल या अपेक्षेनं..! आता तरी जागे व्हा ..परतफेड करण्याची संधी दवडू नका..! संघर्षात साथ द्या..! नाहीतर तरुणांच्या मनात खुपच तीव्र असंतोष आहे हे लक्षात असू द्या..! अशा प्रकारचा आक्रोश या पुरोगामी विचार सरणीच्या आंदोलकांकडून व्यक्त केलेला आहे.
निवडणूका जवळ आल्या आहेत.
महाराष्ट्रातील भाजप, सेना, राष्ट्रवादी मिळून बनलेलं हे त्रिशंकू सरकार मराठा समाजाला न्याय देईलच ही अपेक्षा आहे , कारण २६ जून २०२१ रोजी ( एबीपी माझाने शेअर केलेली पोस्ट) तत्कालीन विरोधी पक्षनेते असलेले देवेन्द्र फडणवीस म्हणाले होते की, "तुम्हाला जमत नसेल तर आमच्या हाती सत्ता द्या, चार महिन्यात आरक्षण देतो, नाहीतर राजकीय सन्यास घेतो..! असं म्हणणारे देवेन्द्रजी फडणवीस सध्या उपमुख्यमंत्री पदावर विराजमान आहेत. खरेतर महाराष्ट्राची सत्ता सध्या भाजपाच्याच हातात आहे. कारण शिवसेनेचे आणि राष्ट्रवादीच्या फोडलेल्या आमदारांची संख्या ४०-४० आहे आणि भाजपाच्या आमदारांची संख्या १०६ आहे. म्हणून महाराष्ट्रातले सरकार सध्या भाजपाचे आहे अर्थात देवेन्द्र फडणवीसांचेच आहे...आणि केंद्रातले सरकारही भाजपचेच असल्यामुळे आणि हा आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या व केंद्राच्या अख्त्यारितला असल्यामुळे तो महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री केंद्रातील सत्तेच्या सहकार्याने सोडवतील यात शंकाच नाही.

# आतुर भाव



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**किती लबाड चाळे करतो आहेस रे! नुसताच पाठशिवनीचा खेळ खेळतो आहेस तूला सारं माहित असूनही असं वागणं बरे नव्हे हं. तुझ्यावरच धरेवरील सगळे जीवजंतू अवलंबून आहेत. तूच त्याची तहान भागवू शकतोस.माहित आहे ना रे तुला? " मग तरीही असा दडी मारून का बसला आहेस. सांगुन टाक एकदाच तू कोणावर रुसला आहेस का ?" खरं तर तू येण्याची चाहूल आधीच आम्हाला लागायची . आमच्यासाठी तो आनंदाचा क्षण असायचा. तू येण्याच्या वाटेवर आम्ही सारे डोळे लावून बसायचो. जगाचा पोशिंदा तर जमिनीची मशागत करून तू कधी मायेच्या कुशीत शिरशील आणि भूईच्या पदरा आडून छोटंसं लेकरू डोकावेल याची वाट पाहायचा असायचा.**

यावर्षीही त्याने तुझ्या स्वागताची तशीच तयारी केली पण,तू काही वेळेत आलाच नाहीस. वाटेत कुठंतरी थांबला असशील म्हणून यायला उशीर झाला असेल असा मनाचच त्याने अंदाज बांधला. पण येशील नक्की म्हणत पेरणीही उरकली. दिवस पुढे जात होते. तू काही येईनास त्यामुळे चिंतेचं सावट सगळीकडे पसारायला लागलं.पेरलेलं बियाणं तर काळ्या आईच्या कुशीत निवांत झोपलं.
एक दिवस आभाळात काळं काळं ढग आलं. त्यांना पाहून लईच भारी वाटलं बघ .आता सरसर सरीत नाचत तू खाली येशील. तापलेल्या भुईची थोडी तरी तहान भागवशील. ती आपला प्रेम पान्हा आपल्या लेकरांना पाझेल. लेकरू मायेचा पदर बाजूला सारत बाहेर डोकावेल असं वाटून गेलं. तू आलास अन किती आनंद झाला म्हणून सांगू. सुरुवातीला टप टप धारांनी टिपकलास. मातीचा मृदगंध सगळीकडे पसरला. तो खोल श्वासात आम्ही भरून घेतला. वृक्षवेली थोड्या टवका रल्या पण, नंतर तुझी नुसतीच भुरभूर सुरु झाली. तेवढाच पान्हा पिऊन हळूच अंकुर डोकावलं. किती तेज होतं त्यावर. एवढसं लेकरू आईच्या मांडीवर खेळू लागलं.आता तरी येशील जोमाने ते वाढेल असं वाटलं. पण तू अचानक गायब झालास. अन तोडचे पाणीच पळाले. हवेवर मस्त झोके घेणाऱ्या पिकांनी माना टाकल्या. विहिरीतल्या पाण्याने तर तळच गाठला. शेतकरी पीक जगवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होता. थोडे थोडे पाणी त्याना पाजत तुझी आळवणीही करत होता .पण तुझा लपाछपीचा डाव काही बंदच होईना. तू नुसता खेळ वतो आहेस नटखट बाळासारखा.
धरणी मायने हिरवा शालू नेसला आहे. तिचं रूप नववधू सारखं सजलं आहे. तिला किती डोळ्यात भरावं असं झालं आहे. पण तू नाही आलास की ती बेसूर होईल बघ. तुझं तिचं नातं जन्मातरीच आहे. विसरू नकोस असा तिला. तीच हिरमुसली तर तुला बरे वाटेल का? तिच्या रूपावर फिदा होऊन आनंदाने गाणेरे पक्षीही चिंतातूर झालेत रे. कोकिळेची कुहूकुहू, मोराचं तुला पाहून धुंद होऊनी नाचणं, सगळंच हरवल्यासारखं झालंय बघ. पावशा पक्षी तर कुठे गायब झालाय त्यालाच ठाऊक. पाहता पाहता श्रावण महिना संपत झाला. तरी तू झुळझुळ झऱ्यातून कधीच वाहिलाच नाहीस. ओढ्याचा खळखळ आवाज यंदा आलाच नाही.तुला अंगावर झेलण्यात खूप मजा येते रे!
लहान थोर आतुर आहेत तुझ्या भेटीसाठी .धुंद सरीत सर्वांनाच चिंब भिजायचंय. चिंब भिजनाना मात्र



प्रत्येकाचा भाव वेगळा आहे बरं. त्या थेंबात भिजताना तुझ्यात एकरूप व्हायचं आहे.तो तुझा स्पर्श हवाहवासा, सुखद वाटतो आहे.रोमरोमातून शहारे उठत आहेत.केसातून ओघळनाऱ्या थेंबाची मोतीमाळेचा आनंद घ्यायचा आहे.तुझ्यासोबत तालही धरायचा आहे.तर काहीच्या मनात प्रचंड दुःख, वेदना आहेत. त्यांनी त्या आत खोलवर दपडून ठेवल्या आहेत. त्याना आपलं मन कुठेच मोकळं करता येत नाही. तो त्यांचा स्वभाव आहे,पण सरीत चिंब भिजताना त्यांचा बांध फुटतो. डोळ्यातील अश्रूनां मोकळी वाट करून देतात. हुंदकाही मोकळा होतो अन अश्रू आपोआप तुझ्याबरोबर वाहुन जातात. मग मन हलकं हलकं होतं. अनेकांचा तू सखा आहेस. त्याला अन तिला तुझ्यासोबत आठवणीतील क्षण साजरे करायचे आहेत. त्यासाठी तू हवा आहेस. तर विरहात व्याकुळ झालेले एकाकी आयुष्य जगावं लागणारे तुलाच आपला साथी मानतात.त्याने दिला धोका दिला पण तू देणार नाहीस ना!फ़क्त माझा सोबती हो. अशीच तुला ती प्रेमाची साद घालते आहे. थकलेल्या जीवांनी अनेकदा तुझा अनुभव घेतलेला असतो.आता तो किंवा तिला सोबत असतेच असं नाही. पानं कधीच गळून पडलेली असतात.पण तू कोसळताना मात्र त्यांचा भूतकाळ जागा होता. क्षीण झालेल्या नजरेतही तुझ्यासाठी प्रेमभाव दाटून येतो.
लहान लेकरांना तू हवाहवासा वाटतोस.त्या चिमुकल्या पावलांना गोल गिरकी घेत,
येरे येरे पावसा तुला देतो पैसा
अशी भिजत गाणी म्हणायची आहेतच पण,
मोठयानांही तुझ्यात लहान होऊन नाचायचं आहे.
आता फार अंत पाहू नकोस हं !
ये वाऱ्याच्या झोतात ते, पक्ष्याच्या गाण्यात ये,
मयुराचा नाचात ये पण ये!

# बोलून मोकळं व्हायचं



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**बोलुन मोकळं व्हायचं हे शब्द किती सहज तोंडाबाहेर पडतात आणि एक जन त्याला समर्थन करतो तर दुसरा एक माईक चालु असल्याचे लक्षात आणून देतो. यातून विकासाच्या नावाखाली एकत्र आलेले नेते जनतेच्या प्रश्नांवर किती बेजबाबदार आहेत याची कल्पना येते. बोलुन मोकळं व्हायच हे शब्द सहज जरी बाहेर पडले असतील तरीही या मागची भुमिका मात्र सहज नाही. बोलुन मोकळं व्हायच म्हणजे आंदोलकांनी जी मागणी केली त्यावर पडदा टाकण्याचे काम करायचे. बोलुन मोकळं व्हायच म्हणजे जनतेच्या आंदोलनाची, समस्यांची दखल घ्यायची नाही, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे फक्त बोलायच काम नाही करायच, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे फक्त राजकारण करायच, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे समस्या सुटणार नाही याची काळजी घ्यायची, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे जबाबदारी झटकायची. बरं बोलुन मोकळं व्हायच असे एखादा कर्मचारी अधिकारी बोलला असता तर समजू शकलो असतो.**

परंतु बोलुन मोकळं व्हायच हे मुख्यमंत्री बोलताना, एक उपमुख्यमंत्री त्यांच्या या मताला अनुमोदन देतात,तर दुसरे उपमुख्यमंत्री समोर माईक सुरू आहे याची जाणीव करून देऊन गप्प बसायला सांगतात. म्हणजे हिंदुच्या विकासासाठी एकत्र आलेले, जनतेच्या विकासासाठी एकत्र आलेले नेते हिंदु मराठा समाजाच्याच समस्या गांभीर्याने घेत नाहीत तर तिघेही मिळून समाजाची दिशाभूल करतात. अनेक कट कारस्थान करून फोडाफोडीचे राजकारण करून लोकशाही ला न जुमानणारे राजकीय नेते लोकांना व लोकांच्या समस्येला जुमानणार तरी कसे ? हा ही तेवढाच महत्त्वाचा प्रश्न आहे. लोकांना जाती धर्माच्या नावाखाली भावनिक बनवून लोकांच्या समस्या वाढवून भ्रष्ट नेत्यांना स्वच्छ करणाऱ्या सरकार कडे जात धर्म हाच एक मुद्दा आहे ज्या मुळे ते लोकांचे लक्ष मुख्य मुद्यावरून हटवू शकतात. जाती धर्माच्या नावावर लोक एवढे भावनिक झाले की स्वतः घरात बेरोजगार तरुण आहेत, खाण्याचा प्रश्न आहे, शिक्षण आरोग्याचा प्रश्न आहे. उधार पैसे घेऊन शिक्षण घ्यावे लागते, कर्जाने पैसे घेऊन दवाखाना करावा लागतो तरीही अंधभक्त म्हणतात धर्म आणि जात धोक्यात आहे. अशा अंधभक्तांना नेमकं काय म्हणाव हेच कळत नाही. राजकीय नेत्यांना बापापेक्षा जास्त महत्त्व देऊन नेत्याने सांगितली तेच पुर्व दिशा म्हणून माणणारे, व राजकीय नेत्यांनी पेटवले तेव्हा घरा दाराचा विचार न करता भविष्याचा विचार न करता धर्माच्या रक्षणासाठी दंगल करणारे भक्त अनेक आहेत. दंगली मध्ये अडलेल्या तरूणांना बाहेर काढायला एकही पुढारी येत नाही तरीही भक्तांना कळत नाही येथे माणूस अडचणीत आहे की धर्म ? माणूस अडचणीत आहे याचे चटके माणूस सहन करत असताना ही जेव्हा राजकीय लोक सांगतात धर्म धोक्यात आहेत तेव्हा भक्त लोक माणसाच्या अडचणीचे चटके सहन करून धर्माच्या रक्षणासाठी समोर येतात. आणि याच समोर येणाऱ्या लोकांचा फायदा राजकीय नेते व पक्ष करून घेतात. जेव्हा सर्व सामान्य माणूस जिवन जगत असतो तेव्हा त्याला कधीच वाटत नाही धर्म धोक्यात आहे. त्याच्या डोक्यात



सतत कुटुंबाचे विचार सुरू असतात. मुलांचे शिक्षण, आईवडीलांचा दवाखाना, शेतीसाठी खर्च, बाजाराची जुळवाजुळव, महागाईच्या काळात काय घ्याव काय घेऊ नये याच विचारात तो असतो. परंतु टिव्ही सुरू केली की हे सर्व विचार त्याचे बाजूला जाऊन समोर तो म्हणजे धर्म. आणि धर्माच्या नावाखाली राजकीय नेत्यांचे समर्थन केले गेले, धर्माच्या व जातीच्या नावाखाली गुन्हेगार व आरोपींना समर्थन दिले गेले, धर्माच्या नावाखाली चुकिच्या बाबी दुर केल्या गेल्या नाही तर धर्म धोक्यात येणार नाही पण त्या धर्मातील लोकांच्या समस्या वाढतील, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो माणूस स्वतः स्वतः ची अधोगती करायला सुरुवात करतो. म्हणून धर्म ही वैयक्तिक बाब आहे ती माणसाने घरात जगायला पाहिजे. बाहेर पडल्यावर माणसाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई या बाबींची गरज पडते. आज पर्यंत धर्माच्या नावावर अनेक दंगली घडवून आणल्या गेल्या लाखो तरुणांवर गुन्हे दाखल झाले, अनेक तरुण धर्माच्या नावावर रस्त्यावर उतरतात परंतु बेरोजगार आहेत. जे नेते म्हणतात धर्म धोक्यात आहेत ते कधी बेरोजगार तरुणांना धर्माच्या नावावर घरखर्च देतात ? ज्या तरुणांनी धर्माच्या नावावर गुन्हे दाखल करून घेतले त्यांच्या जमानतीचा व वकिलाचा खर्च धर्माच्या नावावर लढवणारे नेते करतात ? धर्मातील लोकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी धार्मिक स्थळांमध्ये जो हजारो करोडो रुपयांचा पैसा जमा होतो त्या पैशाचा फायदा कधी शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार तरुच यांना होतो. या पैकी एखाद्या बाबी मध्ये जरी धर्माचा फायदा होत असेल तर खुशाल त्यांनी त्यांच्या प्रमाणे वागावे. परंतु जर धर्माचा अडी अडचणीला फायदा होत नसेल तर तेव्हा धर्माच्या नावावर बोलणाऱ्या आणि जनतेला भावनिक करून दिशाभूल करणाऱ्यांना नेत्यांना जनतेने प्रश्न विचारून धर्मावर नाही तर कर्मावर बोलायला भाग पाडले पाहिजे. राजकीय नेत्यांनी हातात सत्ता असताना धर्म व धर्मातील लोकांसाठी काय केले या बाबत प्रश्न विचारायला पाहिजे. परंतु सध्या परिस्थिती अशी आहे की काही भक्त म्हणतात महागाई कितीही वाढली तरी चालते पण सरकार हेच पाहिजे. हेच का पाहिजे याचे उत्तर कोणाकडेच नाही. देशातील बहुतांश जनता अनेक समस्येशी झुंजत असताना जनतेच्या समस्या सुटत नसतील तर राजकीय नेते व सत्तेचा काय उपयोग. सरकार प्रश्न सोडवत नाही म्हणून आंदोलन करावे लागते आणि आंदोलन करूनही सरकार जर त्या आंदोलकांची हेटाळणी करून फक्त बोलुन मोकळं व्हायच असे बोलत असेल आणि लोकांना चिड येत नसेल तर आजही आपण गुलाम आहेत हे लक्षात येईल. महाराष्ट्र भर आंदोलन करून जिवाची बाजी लाऊन तरुण मागण्या करत असतील आणि सत्तेत बसलेले एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री हे जर दखल घेत नसतील तर मग परिस्थिती मात्र खुपच गंभीर आहे हे लक्षात येते. भारत हा जातीप्रधान देश आहे. येथे जातीवर लढवले जाते पण जातीवर काम केले जात नाही. मराठा समाजाचे आमदार खासदार संख्येने जास्त असताना मराठा समाजाच्या मागण्यांची हेळसांड कॅमेरा समोर होत असेल. आहे हे होत असतात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकमेकांना सांभाळून घेत असतील तर जनतेच्या समस्येवर तोडगा नेमका काढायचा कोणी ? संख्येने जास्त असलेल्या मराठा लोकांची ही परिस्थिती आहे तर अनुसूचित जाती जमाती यांचे आमदार खासदार संख्येने खुप कमी आहेत. तर या समुहातील लोकांच्या समस्या किती गंभीर असतील याचा विचार करणे गरजेचे आहे. मराठा समाजाकडे आर्थिक मजबुती असल्याने काही गोष्टी ते पैशामुळे करू शकतात परंतु ज्यांच्या कडे पैसा च नाही अशा समूदायांनी आपल्या समस्या नेमक्या सोडवायच्या कशा हा संशोधनाचा विषय आहे. संख्येने जास्त, आमदार खासदार जास्त असुनही जर मराठा समाज समस्या ग्रस्त असेल तर न्यायीक दृष्टीने विचार केला तर इतर समाजातील लोकांच्या समस्या सोडवायला कोणी वालीच नाही. जाती प्रधान देशात अगोदर जातीला महत्त्व दिले. माणूस व कर्म यांना जातीच्या बाहेरच्या चष्म्यातून कधीच बघितले जात नाही. आपण जातीचा चष्मा उतरवून कधीच माणसा कडे माणुसकी च्या चष्म्यातून बघितले जात नाही म्हणून सामाजिक समस्या वाढत आहेत. सत्तेत बसलेले जातीचे आहेत म्हणून त्यांच्या विरोधात बोलले जात नाहीत समस्या कायम आहेत. हे जर लोकांना कळाले आणि लोक जाती धर्माची बंधने तोडून केवळ सामाजिक समस्येवर एकत्र येऊन बोलायला लागले तर शिक्षण आरोग्य रोजगार यावर सरकार ला काम करावेच लागेल. जनकल्याण सरकार ला साध्य करावेच लागेल परंतु त्यासाठी लोकांना व्यवस्था कळणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे संविधानाने दिलेल्या हक्क अधिकाराची जाणीव होऊन मताधिकार हा सर्व श्रेष्ट अधिकार आहे याच अधिकारामुळे सत्तेत कोण असेल आणि कोण नसेल हे जनता ठरवु शकते. परंतु सुरवातीला या अधिकाराचा वापर लोकांनी जात पाहुन जातीच्या लोकांना मते देण्यात केला. आणि नंतरच्या काळात ईव्हीएम ने लोकांचा हा अधिकार काढून घेतला. आता लोक नाही तर ईव्हीएम ठरवते कोण निवडून येईल तर. म्हणून ईव्हीएम ला विरोध करून पेपरवर निवडूक घेण्याची मागणी लोकांनी एकत्र येऊन केली तर शासन आपल्या दारी नाही घरी येऊन आपले काम करेल. लोकांच्या समस्या सोडवेल. परंतु ईव्हीएम वर निवडणूक होत असेल तर सत्ताधारी जनतेच्या प्रश्नांना कधीच गांभीर्याने घेणार नाहीत. मग त्यांची भुमिका एकच असेल. बोलून मोकळं व्हायच..

# तुम्हाला माहिती आहे का ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**मला तुम्हालाच विचारायचे आहे. कारण मला काही माहिती नाही. सुशांत सिंग राजपूत, दिशा याच्या आत्महत्येचे, किंवा हत्येचे काय झाले. महिनोन महिने या प्रकरणाचे दळण दळले गेले मिडीयात. सी बी आय, ई डी सारे हात धुऊन मागे लागले. काहीना ( रिया चक्रवर्ती, तिचे वडील, भाऊ) अटकही झाली होती. मग ते काही दिवस आत राहून बाहेर आले. त्या चौकशीचे पुढे काय झाले? निर्दोष असतील तर अटक का केली? दोषी असतील तर शिक्षा का नाही? या बाबतीत तुम्हाला काही माहीत आहे का? अनेक घोटाळे बाहेर आले. आदर्श घोटाळा, सिंचन घोटाळा, नॅशनल हेरॉल्ड प्रकरण, साखर कारखाने, खाजगी बँका, कोविड घोटाळे, असे अनेक आहेत. आरोप होतात. सकाळी पडद्यावर आरोप, पुरावे फडकवले जातात, एफ आय आर दाखल होते. पण पुढे काय. त्याचा पाठपुरावा का होत नाही? लोक तुरुंगात जातात. आजारी पडतात, दवाखान्यात दाखल होतात अन् मग सुटका होऊन उजळ माथ्याने बाहेर येतात. आपण मागचे विसरून जातो.**


मीडिया आपल्याला विसरायला भाग पाडते. आपण बळी पडतो. आता बघा, मणिपूर महिला वरील अत्याचार प्रकरण.. केव्हढे गाजले, संसदेत, बाहेर.. आता चिडी चूप! जसे काही घडलेच नाही! ते सारे असे अचानक विसरण्या सारखे होते का?श्रध्दा तुकडे तुकडे खून प्रकरण.. केस कुठ पर्यंत आली? माहित आहे का?

एका उद्योजकां वरून एक राष्ट्रीय (खरे तर आंतर राष्ट्रीय नेते म्हणायला हवे.कारण ते परदेशात देखील आपल्या देशाची बदनामी करतात!) पुढारी टीका करतात. पण त्याच वेळी ते दुसऱ्या ज्येष्ठ नेत्याच्या मांडीला मांडी लावून बसलेले असतात, ज्याच्या घरी तेच उद्योजक तास भर गुफ्तगू करीत असतात! यावरून कुणी जाब, स्पष्टीकरण विचारत नाही. याचे कारण माहीत आहे का?

आता कुलगुरू चीही चौकशी होणार असा फतवा निघालाय. चांगले आहे. पण ज्यांनी आर्थिक गैर व्यवहार केले, आरोप झाले, विधानसभेत प्रश्न आले, ज्यांना पदा वरून हाकलले.. ते तर उजळ माथ्याने बाहेर फिरताहेत. ही सारी प्रकरण तडीस का नेली जात नाहीत? फायली बंद का पडतात?

सरकारी खात्यातच लाखो करोडोचे आर्थिक घोटाळे होतात. समित्या नेमल्या जातात. चौकशीचे नाटक रंगते! पण पुढे काय होते. आरोपी पकडले जातात का? त्यांना जबर शिक्षा होते का? कामाच्या जागी महिलाचे शोषण होते. त्याच्यावर अशलाघ्य अत्त्याचार होतात. जे अधिकारी,कर्मचारी जबाबदार असतात, त्यांना शिक्षा होते? त्यांचे पगार, पेन्शन थांबवले जाते? त्यांना शिक्षा होते? तेही ताठ मानेने त्याच कार्यालयात मिरवताना दिसतात! जी मीडिया अशी प्रकरणे काही काळ चिघळत असते, तेच प्रकरणावर पडदा टाकून नवे नाटक सुरू करतात.. हा विसरभोळेपणा कशाचे लक्षण आहे, माहित आहे का?

मधूनच एखादे आरक्षण प्रकरण डोके वर काढते. मोर्चे, आंदोलन, उपोषण.. मंडपात भेटीगाठी.. गाव शहरे बंद. वाहतूक ठप्प..





सरकारी मालमत्तेचे नुकसान.. पोलिसाचा बळाचा वापर, त्यावरून रोष.. नेत्यांचे पुतळे जाळणे,..असे सारे काही जोमात सुरू होते. ते अचानक कसे अन् का सुरू होते समजत नाही. अचानक बंद कसे होते तेही कळत नाही. कारण प्रश्न सुटलेले नसतात. किंबहुना कुणाला प्रश्न सोडवायचे नसतात. प्रश्न आहेत म्हणून सरकार आहे. नेते आहेत. पक्ष टिकून आहेत. एरवी या मंडळींनी करायचे काय? त्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय,भाव वाढ, बेरोजगारी, गरिबी, हे सारे जिथल्या तिथे आहे तसेच असायला हवे. प्रश्नच नसतील तर सभा होणार नाहीत, मोर्चे निघणार नाहीत, कुणी उपोषण करणार नाही, मिडीयाला बातमी मिळणार नाही. त्यामुळे एक संपले की दुसरे काहीतरी उकरून काढायलाच हवे. त्यावर रण पेटायलाच हवे. म्हणजे सगळ्यांना काही ना काही काम असेल. सारे बिझी होतील. एरवी रिकाम टेकडे राहतील. पण मुळात हे प्रश्न कोण उकरून काढतं,कोण कुणाला चिथावतं हे माहिती आहे का?

या भ्रष्टाचार विरोधात अनेक आंदोलने झालीत. अण्णा हजारे यांनी एके काळी रण पेटवले. सगळी घाण उपसून काढण्याचा विडा उचलला. पण त्याचे पुढे काय झाले? त्यांचेच चेले जेलमध्ये गेले..! या विरोधा भासाला काय म्हणायचे? ज्यांच्या विरोधात ट्रकभर पुरावे गोळा झाले ते उजळ माथ्याने मिरवताहेत मस्त समाजात! बँक व्यवस्थापक, उद्योजक, बिल्डर अनेक घोटाळे करतात. करोडोचे कर्ज बुडवतात. काही परदेशात पळून जातात. आपण इथे हात चोळीत बसतो. बॉलिवूड व्यवसायात तर करोडोची गुंतवणूक आहे.हा पैसा कुठून येतो, कुठे जातो, कुणाला किती मानधन मिळते, किती कर प्रामाणिक पणे भरला जातो. याचे मिडीयाला काही देणे घेणे नसते का? तिथले आर्थिक गैर व्यवहार बाहेर का येत नाहीत? निकाल देणाऱ्या माननीय न्यायधीश महोदयांना फिक्स मोजकाच पगार, पण त्यांच्या पुढे केस लढणाऱ्या,वकिलाची एकाच केसची, काही तासाची कमाई लाखोत! ही आर्थिक विषमता कुणाच्या नजरेत कशी येत नाही? तुम्हाला माहित आहे का?

आताच काही दिवसापूर्वी पाकिस्तानातील महिला एका साधारण हिंदुस्थानी व्यक्तीच्या प्रेमात पडते, इथे मुलांसह पळून येते हे प्रकरण गाजले. मग त्यात अतिरेकी अँगल, हेरगिरी प्रकरण सारे आले. पाठोपाठ इथून एक मुलगी पाकिस्तानात जाते. तिथे कुणाशी लग्न करते हे सारे  मसाला पाना सारखे चघळले गेले. मुलाखती काय,चर्चा काय, अस्सल प्रेमाचा देखावा काय, सारे नाटक झाले. आता सारे चीडी चूप! जणू काही घडलेच नाही. काय झाले पुढे त्या दोन प्रेमी युगुलाचे? कळायला नको का? आधी जेव्हा मीडिया इतकी भरम साठ स्पेस देतात अशा बातम्यांना, तर त्याचे पुढे काय झाले हे समजायला नको?

एरवी सर्व साधारण परिस्थिती असलेली व्यक्ती कार्यकर्त्याची नेता होताच अल्पावधीत श्रीमंत कशी काय होते? गळ्यात उपरणे अन् हातात झेंडा घेतलेला कार्यकर्ता नगर सेवक होताच किमती गाडीतून फिरायला लागतो. त्याच्या गळ्यात महागडी सोन्याची चेन, सगळ्या बोटात जाडजूड अंगठ्या दिसायला लागतात. मग मोठ्या पुढार्यात उठबस वाढली अन् आमदार, नंतर खासदार ही बिरुदावली लागली की चमत्कार घडावा अशी याच्या आलिशान बंगल्याची उंची, किंमती गाड्यांची संख्या वाढते. एवढा पैसा येतो कुठून? याचे उत्पंनाचे साधन काय? विचारतो कुणी मिडियावला असला प्रश्न? आता अनेकाचे उत्पंना चे आकडे प्रसिद्ध होतात. हे करोडेचे उतपन्न कुठून आले? झाली आहे कधी चौकशी? पडले आहेत कुणाला प्रश्न? माहिती आहेत यांचे कमाईचे सोर्सस? ज्यांनी कधी कुस्ती खेळली नाही ते कुस्ती महासंघाचे अध्यक्ष होणार, ज्यांना क्रिकेट मधले ओ की ठो कळत नाही ते क्रिकेट बोर्डावर ठाण मांडून बसणार. निवड समितीत ढवळा ढवळ करणार.खेळाडूवर कमाईची बोली लावणार. एखादा एस एस सी नापास मुख्य मंत्री,किंवा शिक्षण मंत्री शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदावरील कुलगुरू ची निवड करणार. अन् नंतर क्रीडा, शिक्षण क्षेत्रात भारत मागे का म्हणून चिंतन शिबिरांत भाषण करणार! सगळाच आनंद! आपणच लोकशाही पद्धतीने, बहुमताने निवडून दिलेले सरकार असे कायदे नियम करते हे माहिती आहे का तुम्हाला?

हाच आपला प्रॉब्लेम आहे.आपल्याला कशाचेही काही देणेघेणे नाही. आपल्याला प्रश्न पडत नाहीत. आपल्याला खोलात शिरायचे नाही. आपल्याला नेमके कारण जाणून घ्यायचे नाही. मिडीयाचेही तेच. जे चालते ते तेव्हढ्या पुरतेच चालवायचे. शिळे झाले की टाकून द्यायचे बाजूला.. कोण खरा कोण खोटा हे माहिती असते सर्वांना. तरी ज्याला भाव नाही त्याला डोक्यावर घेऊन तात्पुरते नाचवायचे. सगळा देवघेविचा व्यवहार, व्यापार. यातले काही मिडीयात मोठमोठ्याने चर्चिले जाते. काही मुद्दाम दडपले जाते,काही प्रकरणे मुद्दाम तापत ठेवली जातात,मसाला टाकून अधिक चविष्ट बनवली जातात, तर काही बातम्या अल्पजीवी ठरतात.बाजूला टाकल्या जातात. गौण ठरविल्या जातात.ही एक चाल असते. राजकीय खेळी असते.मागचा पुढचा, पण फक्त स्वतःचा,स्वार्थाचा विचार करून खेळलेली चाल. ज्यालाच राजकारण म्हणतात.

यातले बरेच काही बऱ्याच जणांना माहिती नसते.

तुम्हाला तरी माहिती आहे का?

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९

चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष
Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...
कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# अभियंत्यांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून देशाला समृद्ध बनविण्याची क्षमता : आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आजचा काळ हा तंत्रज्ञानाचा आहे. वैज्ञानिकता आणि अभियांत्रिकी म्हणजे आपल्या समाजाच्या समृद्धीची मार्गदर्शक दिशा आहे. अभियंत्यांनी देशाला प्रगत करणारे अनेक वास्तू, वाहणे, मशनरी तयार केल्या आहेत. अशाच प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून देशाला समृद्ध करण्याची क्षमता अभियंत्यांमध्ये असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. आज चंद्रपूर - गडचिरोली इरिगेशनल कंत्राटदार संघटनेच्या वतीने अभियंता दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संघटनेच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता इंजी काळे, सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता इंजी. मुकेश टांगले, मृद व जिल्हा संलसंधारण अधिकारी इंजि. नीलिमा मंडपे, मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता इंजी. प्रकाश




गायकवाड, लघू पाठबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता इंजी. प्रविण झोड, नागपूर चे जिल्हा जलसंधारण अधिकारी इंजी. श्रीकांत मस्कावार, गडचिरोलीचे जिल्हा जलसंधारण अधिकारी इंजी. पंढरी इंगोले, लघू पाठपंधारे विभागाच्या जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रियंका रायपूरक चंद्रपूर - गडचिरोली इरिगेशनल कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष इंद्रकुमार उके, मार्गदर्शक सुभाष कासनगोट्टुवार, वसंतकुमार सिंग, राजू गोलीवार, उपाध्यक्ष राजेंद्र कन्नमवार, सचिव परवेज सौदागर आदींची मंचावर उपस्थिती होती. पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, अभियंत्यांची देशाला गरज आहे. देशाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान मोठे आहे. बदल्या काळा बरोबर तंत्रज्ञानही बदलत गेले आहे. अभियंत्यांच्या कल्पनेतून हे शक्य झाले आहे. चंद्रपूर जिल्हात विविध मोठ्या पदावर कार्यरत असलेल्या अभियंत्यांवरही मोठी जबाबदारी आहे. आपण नव्या तंत्रज्ञाणाच्या मदतीने येथील विकास कामे गतीशील व दर्जेदार केली पाहिजे. येथील प्रदुषनावर तोडगा काढण्यासाठीही आता अभियंत्यांनी पूढाकार घेतला पाहिजे असे यावेळी बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले. तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण आपल्या देशाचा विकास करू शकतो. आपण नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून देशाला समृद्ध बनवू शकतो. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशाच्या विकासासाठी काम करावे. आपल्या देशाला एक विकसित देश बनवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे. अभियांत्रिकी ही एक अत्यंत महत्त्वाची अभिवृद्धी क्षेत्र आहे. तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी विकासामुळे प्रत्येक देश विकसित होत असतो. सध्या प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात अभियंता कार्यरत असल्यामुळे पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान विकास शक्य झालेला असल्याचेही यावेळी बोलताना ते म्हणाले.
या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उकृष्ट कार्यकारी अभियंता म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता इंजि. सुनिल कुंभे यांना पुरस्कार प्रदाण करण्यात आला. या कार्यक्रमाला अभियंता व अभियांत्रीकी शिक्षण घेत असलेल्या भावी अभियंत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# परांपरागत उत्साहात बैलपोळा सण साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात तथा तालुकाभर बैलपोळा सण परांपरागत उत्साहात आनंदात साजरा करण्यात आला. तर सिओ ने केलेल्या आवाहनालाही बळीराजाने प्रतिसाद दिल्याचे चित्र होती. गुरूवारी दि १४ खुलताबाद तालुक्यात ठिकठिकाणी बैलपोळा सण साजरा करतांना जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना यांनी आवाहन केले होते की लम्पी चर्मरोग संसर्गजन्य आजार असल्याने बैलपोळा निमित्त बैलं एकत्रीत जमा करू नये जेणे करून दुसऱ्या बैलाला संसर्ग होऊ नये त्याऐवजी घरच्या घरी विधिवत पूजन साज करावे म्हणून त्या आवाहनास बळीराजा शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.तर काही बैलं साज करुन आणली गेली परंतु अंतरा अंतरावर उभे करण्यात आली.काही चालत चालत गेली काहींनी उभी करुन शोअप केला.काही ठिकाणी पोळाही फुटला व देव दर्शन निवद करण्यात आले. तर यासंदर्भात ग्रामसेवक, पोलिस पाटील, तंटामुक्तीध्यक्ष सरपंच उपसरपंच सदस्य सतर्क दिसून आले. त्यांनी सकाळीच लम्पी चर्मरोग संसर्गजन्य आजार संदर्भात सुचना करत बैलपोळा सण परांपरागत सजरा कर पण घरीच साजरा करा असे सुचना दिल्या यात ९५%नागरिकांनी पालन करून घरीच पोळा साजरा केला.



# नोकरभरतीत कंत्राटी पद्धत बंद करा बंद करा; ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सरकारने नुकताच जाहीर केलेला शासन निर्णय जीआर सरकारी नोकरी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने भरणे बाबतचा जीआर त्वरित रद्द करण्यात यावा याकरिता ऑल इंडिया पँथर सेना च्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी उपस्थित जिल्हा उपाध्यक्ष पँथन निलेश इंदवे, रोहित वाघ, आकाश घोडे, गोरख अहिरे, सलमान खान, गोपाल शिरसाट ,अजय चव्हाण, सिद्धार्थ आदी उपस्तित होते.

# कावसानकर स्टेडियमवर अतिक्रमण; क्रीडाप्रेमींचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील स्व.कावसानकर क्रीडा मैदानातून रस्ता होत असल्याने हा रस्ता अतिक्रमण करुन होत असल्याचा अरोप विजय सुते यांनी लेखी निवेदन देवुन अतिक्रमण हटवा व क्रिडा प्रेमींना न्याय द्यावा अशी मागणी संबंधित प्रशासनाला केली होती मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याने आता पैठणकर खेळाडू सोबत नागरिकही उपोषणाला बसले आहेत. याठिकाणी अतिक्रमण करणाराला साथ देणार्या संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करा. तसेच 'खेळाडूंचे मैदान अतिक्रमण मुक्त करा' या मागणीसाठी शुक्रवारी (दि.१५) सकाळी क्रीडाप्रेमींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सदर प्रकरणी क्रिडा अधिकारी यांनी उपोषण स्थळी भेट देवुन उपोषण मागे घ्या, अशी तोंडीच विनंती केली मात्र मागणी पुर्ण होईपर्यंत उपोषण चालुच राहणार असल्याचे उपोषणकर्त्याकडून ऐकून अधिकारी परतले.




पैठण शहरातील शासकीय क्रीडा विभागाच्या अंतर्गत असलेल्या स्व. दिगंबरराव कावसानकर क्रीडा मैदानावर क्रीडा अधिकारी, महसूल विभागाचे तत्कालीन तहसीलदार व मंडळ अधिकारी, तलाठी यांनी संगणमत केले. यानंतर क्रीडांगणाच्या मैदानातून परमिट रूम, मंगल कार्यालयासाठी एका हॉटेल मालकाला बेकायदेशीर रस्ता निर्माण करून देण्यात आला आहे. या बेकायदेशीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करावी. यासाठी विजय सुते, अजय परळकर, कपील कावसानकर, ॲड. प्रमोद सरोदे, प्रसाद लोळगे, राजेंद्र पातकळ, निसार बागवान, विजय गव्हाणे, शिवनाथ शिंदे ,सचिन गवळी, अक्षय ससाणे, निखिल पापुलवार यांच्यासह मोठ्या प्रमाणावर क्रीडाप्रेमीने उपोषण मध्ये सहभाग घेतला आहे.

# वरोरा शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेचा मार्ग मोकळा

## दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल वरोरावासीयांकडून मुनगंटीवार यांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वरोरा शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न लवकरच निकालात काढण्यात येईल व या शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होईल, असा शब्द जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी 25 ऑगस्ट 2023 रोजी वरोरा येथे ई लायब्ररीचे उद्घाटन करताना वरोरा वासीयांना दिला होता. याबाबत त्यांनी सतत पाठपुरावा केल्याने वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे पाणी आरक्षण जलसंपदा विभागाच्या 13 सप्टेंबर 2023 रोजीच्या पत्रान्वये वाढवून देण्यात आले आहे. त्यामुळे आता वरोरा शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेचा मार्ग मोकळा झाला आहे. अवघ्या वीस दिवसात पाणी आरक्षण मिळवून दिल्याने नागरिकांनी पालकमंत्री यांचे आभार मानले आहे.
सन 2055 या वर्षात वरोरा शहराची लोकसंख्या जवळपास 62 हजार इतकी गृहीत धरून वाढीव शहरी पाणीपुरवठा योजनेसाठी वार्षिक 3.66 दलघमी पाणी लागणार आहे. त्यानुसार मुख्य अभियंता जलसंपदा विभाग नागपूर यांचे 13 सप्टेंबर 2023 रोजीच्या पत्रान्वये 2.70 दलघमी अतिरिक्त पाण्याचे आरक्षण वर्धा नदीवरील मार्डा बॅरेज येथून



उचल करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे जुने 0.96 दलघमी पाणी आरक्षण व नव्याने मंजूर केलेले 2.70 दलघमी असे एकूण 3.66 दलघमी पाणी आरक्षण वरोरा शहरासाठी मंजूर झाले आहे. या पाणी आरक्षणनुसारच आता वरोरा शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. वरोरा शहरासाठी अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना सन 1972 पासून कार्यान्वित आहे. या योजनेला आता 50 वर्षे पूर्ण झाले असून सन 2011 च्या लोकसंख्येनुसार वरोरा शहराची लोकसंख्या 46,532 एवढी आहे. शहराचे आधुनिकीकरण व औद्योगिक वसाहतीमुळे पाणीपुरवठा मागणी वाढली असल्याने जुनी पाणीपुरवठा योजना अपुरी पडत होती. नगर परिषद वरोरा यांच्या मागणीनुसार 135 लिटर प्रति दरडोई निकषाप्रमाणे सन 2055 प्रकल्प वर्षासाठी शहराची लोकसंख्या जवळपास 62000 इतकी गृहीत धरून नवीन पाणीपुरवठा योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. 25 ऑगस्ट 2023 रोजी शहरात श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी ई लायब्ररीच्या उद्घाटन कार्यक्रमाला पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार आले असता, नागरिकांकडून वाढीव पाणीपुरवठा योजनेबाबत मागणी करण्यात आली होती. वरोरा शहराच्या नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी शहरासाठी लवकरच वाढीव पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात येईल, असा शब्द दिला होता. त्याची पूर्तता केवळ 20 दिवसात झाल्याने वरोरा वासीयांकडून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे.

# 'संदेश साहेबांचा' अखेरच्या घटकापर्यंत पोहोचवा

## जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचारांना मानणारे केवळ महाराष्ट्रातच नव्हे; तर, संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात चाहता वर्ग आहे. शरद पवार यांनी कुठल्याही परिस्थितीत, कसलीही तडजोड न करता, भाजपसोबत न जाण्याचा निर्णय योग्य समजला आहे. त्याअनुषंगाने पक्षाकडून "संदेश साहेबांचा " हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमास सर्व समाजातून उत्स्फूर्त असा प्रतिसाद देखील मिळत आहे.




त्यानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील युवा नेत्यांची एक फौज पक्ष बळकट करण्यासाठी विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात साहेबांचा संदेश घेऊन येत आहेत. हा उपक्रम वाशिम जिल्ह्यातील प्रत्येक समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचवा..! असे आवाहन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी सर्व कार्यकर्त्यांना केले आहे. यानिमित्ताने नागपूर येथे पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे. पक्षाचे युवा आमदार रोहित पवार, आ. सुनील भुसारा, आ. संदीप क्षीरसागर, रोहित आर. आर. पाटील, आदी युवा नेत्यांची फौज विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात दौरा करणार आहे. शरद पवार यांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला असल्याची माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या हप्त्यात या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्याअनुषंगाने संबंधित कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी नागपूर येथे एक बैठक बोलावण्यात आली होती. सदर बैठकीत वाशिम जिल्ह्याचे अध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी सुरुवातीपासूनच पक्ष संघटनासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वात वाशिम जिल्ह्यात निश्चितच पक्षाला आणखीनच बळकटी मिळणार..! असा विश्वास सर्व नेत्यांनी व्यक्त केला आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते पांडुरंग ठाकरे, सुनील पाटील, अनंता काळे, जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे, रमेश गोटे, मालेगावचे भगवानराव शिंदे, प्राध्यापक गायकवाड, किशोर लहाने, खाडे, नितीन सरकटे, इम्रान फकीरावाले आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना वाशिमच्या जिल्हाध्यक्षांनी उपरोक्त आवाहन केले आहे.

# सावंगीत दिवसभर पावसाची रिमझिम; पिके खुलली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी आज दि.१५शुक्रवारी रोजी उतरा नक्षत्र पावसाची दिवसभर रिमझिम सुरु होती रिमझिम पावसामुळे मात्र खरिप पिके खुलली आहे.

गत दोनचार दिवस पुर्वा नक्षत्राच्या संततधार पावसामुळे खरीप पिके टवटवीत हिरवीगार झाली व फडफडत आहे यात दोन दिवसाच्य ब्रेक थांब्यानंतर उताराच्या रिमझिम पावसामुळे पिके खुलली आहे.उघडीपीत औषधी फवारणी खते टाकणी गवत काढणी बळीराजाने केली व आज पुन्हा पाऊस पुर्ववत झाल्यानें बळीराजा शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहे.

तो आनंदी दिसून आला. कारण ऐन फुलाऱ्यात पावसाने दडी मारल्याने शेतकरी हतबल परेशान झाला होता. मात्र पावसाचे आगमान शेतकऱ्यांना खुश करुन गेला आहे हे विशेष. पावसाळा संपत आला तरी अद्याप अर्धाही पाऊस झाला नाही की ओढे नदी नाले तलाव कोरडे ठाक पडून आहे. पुरपाणी आले नाही. परंतु संततधार रिमझिम पावसामुळे शेतकरी खुश दिसून येत आहे व शेवटच्या टप्प्यात का होईना वा परतीचा ही मोठा पाऊस येईल त्याला आशा आहे व वेधशाळा व अन्य कडूनही परतीच्या पावसाचे भाकीत असल्याने शेतकरी आशावंत बनून आहे हे विशेष.

# डॉ.रामचंद्र महाराज पारनेरकर मंदिराच्या रौप्यमहोत्सवी वर्धापन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील जीवन कला मंदिरा तर्फे पुर्णवाद वर्धिष्णू डॉ.रामचंद्र महाराज यांच्या मंदिराचा वर्धापन दिनाचा रौप्य महोत्सव पैठण येथे नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी नाथवंशज रावसाहेब महाराज गोसावी, अमृतराय संस्थानचे संस्थानाधिपती प्रफुल्ल महाराज तळेगावकर, पुर्णाचार्य डॉ. शरदराव पाडाळकर, पुर्णाचार्य आनंद मुठाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी परमपुज्य पुर्णवाद वर्धिष्णू डॉ.रामचंद्र महाराज व पुर्णवाद प्रणेते डॉ. विष्णू महाराज पारनेरकर



यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मंदिरातील पुर्णाचार्य पंडित कि.पं पाडाळकर स्मृती सभागृहात संपर्क ग्रंथ अभ्यास शिबिर घेण्यात आले. पहिल्या सत्रात 'संस्कार म्हणजे मनोरचनेवरील प्रभुत्व' या विषयावर डॉ.शरदराव पाडाळकर यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात पुर्णवाद शिक्षक हरीभाऊ धाट यांनी 'सहजं कर्म ते त्यजेत' या विषयावर विवेचन केले. ग्रंथ शिबिराचा समारोप पुर्णाचार्य आनंद मुठाळ यांनी 'व्यवस्था म्हणजे सौंदर्य' या विषयावर मार्गदर्शन करुन केला. दरम्यान, रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सेवाभावी कार्य करणाऱ्या रेखाताई कुलकर्णी, वसंत वासुंदेकर, महेश जोशी, सतीश तांबोळी, संध्याताई पाठक, श्रीमती वैद्य यांचा स्मृतिचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात आनंद मुठाळ यांनी मंत्र पठण केले तर जयश्री गडकरी यांनी अभंग गायन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवन कला मंदिराचे प्रमुख महेश पन्नाभट्टी, सुनिता पन्नाभट्टी, दिप्ती मंगीराज, कमलेश देशपांडे आदींनी पुढाकार घेतला.



# बंदोबस्ताचे चोख कर्तव्य बजावत हसनाबाद पोलिसांनी लुटला पोळा सणाचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजुर :** सण,उत्सव म्हटलं की आपल्या आनंदाला पारावर राहत नाही. परंतु याच उत्सवात पोलीस दादांचा ताण वाढतो.लगतच्या काळात पोळा, गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद यासारखे सण एकापाठोपाठ आल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यासह पोलीस कर्मचारी बंदोबस्तमध्ये व्यस्त असल्याचे दिसून आले.सततच्या बंदोबस्तमुळे पोलिसांवर शारीरिक आणि मानसिक ताण पडतो. परंतु प्रचंड तनावतही पोलीस विरंगुळा शोधण्याचा प्रयत्न करतो.

फावल्या वेळात तणाव दूर सारून पोलीस दादा आनंद लुटत असतात. याची प्रचिती काल भोकरदन तालुक्यातील राजूर येथे बैलपोळा सणानिमित्त आली. बैलपोळ्या निमित्त अनुचित प्रकार घडू नये म्हणून हसनाबाद पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.कर्तव्य बजावत हसनाबाद पोलिसांनी राजूर येथील ग्रामस्थांमध्ये सहभागी होऊन पोळा सणांचा मनमुराद आनंद लुटला. सध्या जालना जिल्ह्यात मराठा आरक्षण आंदोलन सुरू आहे.आंदोलकांवर लाठीहल्ला झाल्यामुळे जिल्ह्यात तणावपूर्ण वातावरण आहे. अनेक ठिकाणी धरणे,आंदोलने चालू आहेत. त्यातच राज्यातील प्रमुख व्यक्ती आरक्षण स्थळी जाऊन आंदोलनकर्त्यास भेटी देत आहेत.त्यामुळे बंदोबस्तसाठी बराच फौजफाटा तिकडे गुंतला आहे. अशातच पोळा,गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद यासारखे सण तोंडावर आले आहेत.मुळातच पोलिसांचे मनुष्यबळ कमी असल्याने पोलीस दादांचा ताण अधीकच वाढला आहे. सणासुदीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी नुकतीच हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनानुसार व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. जी. एस.दराडे यांच्या अध्यक्षतेखाली राजूर येथे शांतता समितीची बैठक पार पडली. त्यानुसार सपोनि नागवे यांनी आपल्या हद्दीतील गावांमध्ये पोळ्यानिमित्त चोख बंदोबस्त लावला होता.

काल हसनाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये पोळा सण शांततेत पार पडल्याचे दिसून आले. शेवटी हसनाबाद पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना पोळा साजरा करण्याचा मोह आवरला नाही. पोलिसांनी राजुर येथील ग्रामस्थांसोबत हातात बैल धरून पोळा सण साजरा करत आनंद लुटला. दैनंदिन जीवनातील तणावातही आनंदी क्षण कसे निर्माण करायचे हे पोलिसांच्या एका छोट्याशा कृतीतून दिसून आले. यावेळी हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे,फौजदार शिवाजी देशमुख, जनार्धन भापकर, दीपक सोनुने, नरहरी खार्डे,राहुल भागीले,राजेंद्र पवार, राजू वाघमारे,रवींद्र राठोड, नारायण सरवंडे,निलेश खरात, प्रकाश बोराडे,भिवसने, डुकरे आदी जणांनी चोख बंदोबस्तचे कर्तव्य पार पाडले.




# दैनिक आधुनिक केसरीचा इम्पॅक्ट; बातमी लागताच पालिकेचे काम सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** काही दिवसापूर्वी साक्री रोड येथील सिंचन भवन येथे मोठी पाईपलाईन लीक झाल्याने अनेक दिवसांपासून पिण्याचे पाणी वाहत होते. धुळ्यात पाण्याची परिस्थिती बिकट असताना पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष अशी बातमी आधुनिक केसरी युट्युब चॅनेलच्या माध्यमातून प्रसारित केल्याने दुसऱ्या दिवशी तात्काळ महानगरपालिका अधिकाऱ्यांनी दखल घेऊन काम सुरू केले. या ठिकाणी अभियंता नवनीत सोनवणे, व कनिष्ठ अभियंता चेतन नवसारी यांच्या उपस्थितीत तात्काळ काम सुरू करण्यात आले व स्थानिक व्यावसायिक नागरिकांनी आधुनिक केसरीचे आभार मानले.

# भव्य राज्यस्तरीय ऑनलाईन गणेश व महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन

## दैनिक मराठवाडा साथी, राजस्थानी मल्टीस्टेट आणि राधा मोहन साथी प्रतिष्ठान यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**परळी :** दैनिक मराठवाडा साथी, राजस्थानी मल्टीस्टेट आणि राधा मोहन साथी प्रतिष्ठान यांच्यावतीने राज्यस्तरीय ऑनलाईन गणेश व महालक्ष्मी सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत राज्यभरातील सार्वजनिक गणेश मंडळ आणि वैयक्तिक घरगुती गणेश तसेच महालक्ष्मी सजावट करणाऱ्या स्पर्धकांना सहभागी होता येणार आहे. आकर्षक सजावट करणाऱ्या स्पर्धक विजेत्यांना आर्थिक स्वरूपात बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे असल्याची माहिती स्पर्धेचे मुख्य संयोजक तथा मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांनी दिली दिली आहे. गौरी आणि गणेशोत्सव ही सर्वांसाठीच आनंदाची पर्वणी असते. गेल्या अनेक वर्षांपासून दैनिक मराठवाडा साथी, राजस्थानी मल्टीस्टेट आणि





राधा मोहन साथी प्रतिष्ठान यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. ज्यामध्ये अधिकारी, सामाजिक आणि राजकीय पदाधिकारी यांच्या मुलाखती व विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यावर्षी राज्यस्तरीय ऑनलाईन गणेश व महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सहभागी स्पर्धक विजेत्यांना सार्वजनिक गणेश मंडळांसाठी प्रथम बक्षीस ११००१ रुपये, द्वितीय बक्षीस ७००१ रुपये, तृतीय बक्षीस ३००१ रुपये याप्रमाणे तर महालक्ष्मी व घरगुती गणेश स्पर्धासाठी स्वतंत्र बक्षिसे प्रथम बक्षीस ५००१ रुपये, द्वितीय बक्षीस ३००१ रुपये, तृतीय बक्षीस २००१ रुपये याप्रमाणे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धेचे मुख्य संयोजक तथा मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांनी दिली असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इथे करा संपर्क

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी चंद्रशेखर फुटके - 9325063512, मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक ओमप्रकाश बुरांडे - 9422094111, डॉ.प्रभू गोरे - 9075716739 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंशत: अनुदानित शाळा कर्मचाऱ्यांच्या आशेचा 'किरण' चमकला

## शिक्षक आमदार ॲड. किरण सरनाईक यांच्या पाठपुराव्यांचे सुयश

आधुनिक केसरी न्यूज



**वाशिम :** राजकीय विश्वात कोणताही गॉडफादर नसताना, जे लोकप्रतिनिधी केवळ कर्तव्यनिष्ठेच्या बळावर कर्तुत्वाचा हिमालय उभा करून स्वतःचे एक आगळे वेगळे अस्तित्व निर्माण करतात. अशा लोकप्रतिनिधींच्या यादीत अमरावती शिक्षक मतदार संघाचे आमदार ऍड. किरणराव सरनाईक यांचे नाव अग्रस्थानी आहे. याबाबतीत केवळ, शाळा व सबंधित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीच नव्हे; तर, इतर कर्मचारी व शेतकरी आणि राजकीय जाण असणारे राजकीयतज्ञ, सुद्धा ऍड. सरनाईक यांच्याप्रति आदर व्यक्त करत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे, त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या अगदी सुरुवातीपासूनच कार्यतत्परतेत आघाडी घेतली आहे. त्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोबतच, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या देखील पोटतिडकीने पावसाळी अधिवेशनात मांडल्या आहेत. परिणामी, त्यांच्या लोकप्रियतेत आणखीनच भर पडली आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत व अभ्यासू नेता म्हणून ते केवळ वाशिम जिल्ह्यातच नव्हे; तर संपूर्ण विदर्भात नावारुपास आले आहेत. त्यांनी शासन दरबारी मांडलेल्या अनेक समस्यांच्या पाठपुराव्यांची सरकारने सकारात्मक दखल घेतली आहे. ५ सप्टेंबर रोजी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. ना. श्री. दिपक केसरकर यांची भेट घेऊन आमदार किरणराव सरनाईक यांनी उर्वरित अनुदान आदेश वितरित करण्यासंबंधी मागणी केली होती. त्यासंदर्भात २४ एप्रिल च्या परिपत्रकामधील मार्गदर्शक तत्त्वात योग्य तो बदल करून, नवीन पत्रक लवकरच निर्गमित केल्या जाईल, असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसातच नवीन अनुदान वितरणाचे आदेश निर्गमित होण्याची शक्यता बळवली आहे. त्यामुळे अंशतः अनुदानित शाळा व सबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आशेचा " किरण " फुलला असल्याचे बोलल्या जात आहे.

वाशिम जिल्ह्यातील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा असलेले, ॲड. किरणराव सरनाईक यांनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासोबतच, अनेक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे मार्गदर्शन केले आहे. आजही, त्यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्र उभारणीची क्षमता निर्माण करण्यासाठी अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रम राबविल्या जातात. नवीन शैक्षणिक पद्धत स्वीकारली जाते. सोबतच उत्तम अध्यापनाची गुणवैशिष्ट्ये असणारी शिक्षक मंडळी असल्याने, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची परंपरा शाळेच्या निकालातून दरवर्षी अधोरेखित होते. राजकीय क्षेत्रात फार मोठा असा कोणताही गॉडफादर नसताना, जिल्ह्यातील शिक्षणमहर्षी म्हणून प्रसिद्ध असलेले त्यांचे वडील स्व. ॲड. आप्पासाहेब सरनाईक यांचे पुरोगामी विचार व सामाजिक तळमळ आमदार सरनाईक यांनी फुलाप्रमाणे जोपासली आहे. आणि त्याचबळावर ते गेल्या वर्षीच्या अमरावती शिक्षक मतदार संघातून निवडणूक सुद्धा लढले होते. सदर निवडणुकीत त्यांनी प्रस्थापितांचा पराभव करून आमदारकी मिळविली आहे.



वसंत खडसे
9373578429

आपल्या कारकिर्दीची, एक लोकप्रतिनिधी म्हणून सुरुवात करतांना त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील समस्या सोडविण्यावर विशेष भर दिला. त्यात प्रामुख्याने कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना, शाळांचे प्रलंबित असलेले अनुदान, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, तसेच शाळांना उपयुक्त असणारे व्हाईट बोर्ड आदी कामांसाठी प्रयत्न तर केलेच; त्याशिवाय राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबत सभागृहा तारांकीत प्रश्न सुद्धा उपस्थित केला होता. तद्वतच, एनसीसीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टिकोनातून वाशिम येथे एनसीसीचे मुख्यालय स्थापन करण्यासाठी लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले होते. या व्यतिरिक्त आमदार ॲड. सरनाईक यांनी गतवर्षीच्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान व त्यादृष्टीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी सुद्धा पोटतिडकेने सभागृहात केली होती. अशा अनेक मागण्यांचा पाठपुरावा त्यांनी सातत्यपूर्ण केल्यामुळेच, सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्यांनी केलेल्या योग्य मागण्यांना एक सामाजिक भान असून, त्याला राजकीय कर्तुत्वाचा आधार त्यांनी दिला असल्याचे आज सर्वत्र बोलल्या जात आहे. शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांचे कर्तुत्व म्हणजे, सार्वजनिक जीवनात येनाऱ्यांसाठी एक आदर्श निर्माण करणारे आहे. यात कुणाचेही, किंबहुना त्यांच्या विरोधकांचेही दुमत असू शकत नाही. कारण त्यांचा नुकताच साजरा झालेला वाढदिवस व त्यांना शुभेच्छा देण्यासाठी लोटलेला अथांग जनसागर हा त्यासाठीचा एक ज्वलंत पुरावा पुरेसा आहे..! त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख असाच उत्तरोत्तर वाढत राहो हीच आधुनिक केसरी कडून सदिच्छा..!!



# वडोद बाजार येथे पोळा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथे पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशासनाकडून पोळा सणानिमित्त बैलजोडींची गर्दी होऊ नये म्हणून पोळा सण घरी साजरा करण्याचा आवाहन करण्यात आले होते. मात्र काही ठिकाणी पोळ् सणा निमित्त बैलांची गर्दी दिसणारे तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी आपल्या बैल जोडीला गर्दीत आणणे टाळले. परिसरात पावसाचे प्रमाण कमी असतानाही शेतकरी आपल्या शेतात राबवणाऱ्या बैलजोडीचा सण पोळा म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करतो सकाळपासूनच पोळ्याची जय्यत तयारी केली जाते खरेदी करून बैलजोडीच्या शिंगाला हिंगोळ गळ्यात घागर मळा पायात पैंजण सर मोरखी नवीन कासरा लावून बैलाची गावात मिरवणूक काढली जाते व नंतर घरी औक्षण करून पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो.

# लक्ष्मी मातेची जत्रा उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**माळीवाडा :** येथील लक्ष्मीमाता नवसाला पावणारी देवी असुन खूप जुने परंपरा असलेले बारा गाड्या ओढण्याची परंपरा आजही जोपासली जात आहे. या यात्रेमध्ये शेतकऱ्यांच्या बारा गाड्या जमा करून त्या एकमेकांना दोरखंडाने बांधून समोरील गाडीला लालदोराला एस आकारांच्या लोखंडी गंजापासुन बनवलेल्या असतो त्याला गळ म्हणतात. हा गळ नवस फेडण्या-याचा कमरेला लावुन नवस बोलावरच गाड्या ओढतात जर एखाद्याने खोटा नवस सांगितला तर या गाड्या ओढत नाही जेव्हा खरा नवस सांगितला तरच गाड्या ओढतात. या बारा गाड्या ओढण्याची सुरुवात दहा वाजता सुरू होते. दौलताबाद माळीवाडा रोडवरील गावांच्या वेशीवरील हनुमानाच्या मुर्तीची पुजा करुन सुरुवात होऊन सांगता संध्याकाळी सात ते साडेसात वाजता लक्ष्मी आईच्या मंदिराजवळील होते. गावातील मुलींचे लग्न झालेल्या सासरी गेलेल्या मुली व जावई त्यांची मुले, मुली, लक्ष्मी आईच्या बारा गाड्या ओढण्यासाठी येतातण. या यात्रेला महाराष्ट्रांतील मुंबई , ठाणे, पुणे, नाशिक,नगर, धुळे, जळगाव, जालना, छ.संभाजीनगर, इत्यादी जिल्हातुन लक्ष्मी आईचा नवस फेडण्यासाठी बारा गाड्या ओढण्यासाठी माळीवाडा, दौलताबाद, अब्दिमंडी, रामपुरी, तांडा, कैसापुरी, फतियाबाद, वडाचीवाडी, वंजरवाडी, शेरणापूर, आसेगाव, जभांळा व परिसरातील नागरिक व भक्तगण मोठ्या संख्येने यात्रेमध्ये सहभागी होतात. यावेळी या प्रमाणामध्ये युवक गावकरी मोठ्या प्रमाणित उपस्थित मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# पालावरील मुले शिक्षणाने झाली बोलकी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** टिचभर पोटाची खगळी भरण्यासाठी सतत भटकंतीवर असणारे पालाचे घर..ना घर नात्रदार, सडा, सारवण, रांगोळी, सणऊत्सव, पाहूणचार, आणि मूलाच्या शिक्षणा पासून कोसोदूर असणारे कुटुंब.. केवळ जगण्याची आस मनी धरून भ्रमंतीवर असतात..अशा उपेक्षित कुटुंबातील बालकांना अक्षराची ओळख व्हावी म्हणून धडपडणारा एक अवलिया माणूस.. सवड मिळेल तसा स्वखर्चाने पालावर जावून बालकाना मोफत शिक्षणाचे धडे देतो आहे..अक्षराची ओळख नसलेले दूर्लक्षीत मूल-मूली आता अक्षर गिरवताहेत.

प्रारंभी शिक्षणाची सूविधा उच्चभ्रू आणि धनवान माणसाला मिळत असल्याने तळा गाळातील सामान्य माणुस शिक्षणापासून कोसोदूर होता. ही व्यथा महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना सहन झाली नाही. मागचा पुढचा विचार न करता या दाम्पत्यानी पुण्यात शिक्षणाची पहिली शाळा सुरू केली.

तेव्हापासून सर्वांसाठी शिक्षणाची कवाडे सताड ऊघडी आहेत. आजघडीला एकहि घटक शिक्षणापासून वंचित राहीला नाही हि बाब आपल्या सर्वांसाठी महत्वाची आहे.दरम्यान शिक्षण क्षेत्रातही हळुहळू भ्रष्टाचार सुरू झाला आहे. म्हणावी तेव्हढी गुणवत्ता टिकून राहिली नाही. खाजगी शिक्षवणीने तर कहरच केला आहे अशा रंवदळीत गरीब, शेतमजूर,कामगार, पालावरील आणि ऊसतोड कामगाराच्या मूलाना ईच्छा असूनही अडचणींमुळे शिक्षणाच्या प्रवाहात येता आल नाही. शासनाने उपेक्षित मूलाची होणारी गैरसोय लक्षात घेऊन त्याना शिक्षणाची ओळख करून देण्यासाठी योजना आखली पण ती फारसी यशस्वी झाली नसल्याचे समजते. शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलामुलींना अक्षर ओळख करून देण्याचा संकल्प उत्तम पाईकराव यांनी केला नव्हे तर प्रत्यक्ष गोरगरीब, अनाथ, पालावरील मुलाना सवड मिळेल तेंव्हा मोफत शिक्षण देण्याचा संकल्प केला आहे. टाकराळा (ता. हिमायतनगर) पंचक्रोशीतील मूले आता शिक्षणाच्या सावलीत अक्षर गिरवताहेत. या अनोख्या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक केले जाते आहे.



# ओबीसी समाज भाजपच्या प्रवाहात आणणार

## गणपत पीठ्ठेवाड यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** भारतीय जनता पक्षानी "सबका विकास सबका साथ" हे धोरण राबवून सर्व जातीधर्माला समान न्याय देण्याच काम केले आहे. ओबीसी समाजाला झुकतमाप देत भविष्यात भाजपाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल असा विश्वास गणपत पीठ्ठेवाड यांनी व्यक्त केला आहे. भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष पदी पिठ्ठेवाड यांची निवड करण्यात आली. निवड जाहीर होताच शहरात फटाक्यांची आतषबाजी करून कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बाळा साखळकर, माधव पाटील शिंदे, माऊली पाटील चिंचाळकर, बालाजी वाघमारे,हरीभाऊ चटलावार, राजू देशपांडे, रमेश मतकमवाड,आंनद डांगे, शिवा जाधव, सुनील शहा याची ऊपस्थिती होती. पीठ्ठेवाड म्हणाले की,मागील अनेक वर्षापासून राजकारनाची दिशा बदलण्याचे काम ओबसी समाजाकडून होत असते. नांदेड जिल्ह्यात ओबीसी मतदान बहुसंख्येने आहे त्यामुळे राजकीय ट्रनिग पॉइंट म्हणून या समाजाकडे बघितले जाते. येणाऱ्या काळात माझ्यावर पक्षाने दिलेली मोठी जबाबदारी पार पाडत जिल्हाभर पक्ष संगठन मजबूत करण्यासाठी मी आहोरात्र मेहनत करून पक्षाला बळकटी देण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहिल, अशी ग्वाही बोलताना दिली आहे. कार्यक्रमास पंचक्रोशीतील भारतीय जनता पक्षाचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागपूर जिल्ह्यात संततधार, तीन धरणांचे दरवाजे उघडले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय हवामान खात्याने जिल्ह्याकरिता १६ सप्टेंबर २०२३ ला ऑरेंज अलर्ट दिलेला असून बऱ्याच ठिकाणी जोरदार ते मुसळधार पावसासह वादळी वारा व वीज गर्जना होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. जिल्ह्यात संततधार होत असलेल्या पावसामुळे पेंच तोतलाडोह व नवेगाव खैरी धरण पूर्ण १००% भरलेले असून तोटलाडोह धरणाचे १४ पैकी १० दरवाजे ०.४ मी तर नवेगाव खैरी धरणाचे सर्व १६ दरवाजे ०.३ मी ने उघण्यात आलेले असून त्या मधून ५०० पेक्षा जास्त क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग पेंच नदीमध्ये सुरू आहे. तसेच जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पातील धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरलेले असून त्या धरणातून देखील नदीमध्ये पाण्याच्या विसर्ग सुरू आहे. या अनुषंगाने लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



# श्री गणरायाचे आगमन खड्ड्यांतून

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** खारघर शहराच्या प्रवेशद्वारापासून ते वसाहती मधील मुख्य रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत.गणेशोत्सव अगदी तीन-चार दिवसांवर येऊन ठेपला आहे.त्यामुळे तातडीने पनवेल महापालिका प्रशासनाने गणेशोत्सवपूर्वी रस्ते दुरुस्ती करावी अशी मागणी खारघर शहरातील नागरिकांनी केली आहे. रस्ते दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्यास भाविक भक्तांना खड्डयांतूनच बाप्पाला निरोप देण्याची वेळ येणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे पनवेल महापालिका प्रशासनाने खारघर वसाहतीमधील रस्ते त्वरित दुरुस्त करून रहिवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे. बेलपाडा, खारघर गाव, घरकुल, सेंट्रल पार्क मेट्रो स्थानक,तळोजा मध्यवर्ती कारागृह,खुटुकबांधण व पापडीचा पाडा इत्यादी ठिकाणी गणेश विसर्जन तलाव आहेत.येथील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले दिसून येत आहेत.तसेच गणेश विसर्जन तलावात अस्वच्छता पसरली आहे.

खारघर मधील सेक्टर ३ , सेक्टर ४ व सेक्टर ५ येथील बहुसंख्य भाविक भक्त गणेश मूर्तीचे विसर्जन बेलपाडा गावालगत असलेल्या तलावात करतात .गणेशोत्सवापूर्वी पनवेल महापालिका प्रशासनाकडून तलाव परिसरात स्वच्छता करण्यात यावी .
**शिरीष घरत, रायगड जिल्हाप्रमुख, शिवसेना ( उबाठा )**

खारघरमध्ये खड्डेमय रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे . गणेशोत्सवापूर्वी रस्ते दुरुस्तीचे काम गतीने व्हावे, यासाठी कामगारांची संख्या वाढवण्यात येणार आहे .
**संजय कटेकोर, कार्यकारी अभियंता, पनवेल महापालिका**

# हुतात्मा सांडू सखाराम वाघ यांना बोरगाव येथे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** मराठवाडा मुक्ती संग्रामात निजामाचा कर्दनकाळ हुतात्मा सांडू सखाराम वाघ यांना  बोरगाव अर्ज येथील स्मारकावर त्यांच्या पुण्यतिथी निमित्त १४ सप्टेंबर रोजी बोरगाव अर्ज ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्यासह नाभिक समाजातील विविध संघटनांच्या वतीने पुष्पांजली अर्पण करत अभिवादन करण्यात आले .

भारत स्वतंत्र झाल्यानंतरही सरासरी एक वर्षापेक्षा जास्त काळ निजामाच्या रजाकारांनी  मराठवाड्यावर आपले राज्य चालवले होते  . यां निजाम रजाकारांच्या महिला - पुरुषावरील जुलमी अत्याचारला कंटाळून अनेकांनी हैदराबादच्या निजाम विरुद्ध मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढयात  स्वतःला झोकून घेतले .यातील निजामाचा कर्दनकाळ बोरगाव येथील हुतात्मा सांडू सखाराम वाघ यांनी निजामी शिक्षण पद्धतीला विरोध करून प्रथम बंड केला होता. महिलांवर डोळ्यादेखत होणारे अत्याचार सहन न झाल्याने त्यांनी सवंगड्यांसह स्वातंत्र सैनिकांनी बंड पुकारत निजामांना पळो कि सळो करून सोडले होते. १४ सप्टेंबर रात्री त्यांचे गनिमी काव्याने पकडून त्यांचा नांदखेडा शिवारात शिरच्छेद करण्यात आला होता. त्यांचा मृतदेह अंधारात काटया - फसाट्यावर टाकून अंत्यसंस्कार केले होते. त्यापुर्वी निजामी सैनिकांनी त्यांचे शिर बोरगाव येथील वेशीवर लटकवण्यात आले होते. यातून दहशत निर्माण होऊन सैनिक हार मानतील  अशी निजामाच्या अपेक्षा होती ती फोल ठरली आणि लढा आणखी तीव्र होत गेला आणि १७ सप्टेंबरला मराठवाडा निजानाच्या जोखडातून मुक्त झाला. अशा या शूरवीराचे शिर असलेल्या ठिकाणी समाधी स्थळ असून बोरगाव येथे त्यांचे भव्य असे स्मारक आहे. या ठिकाणी बोरगाव अर्ज ग्रामपंचायत व ग्रामस्थ व नाभिक समाजाच्या विविध संघटना पदाधिकारी यांनी अभिवादन केले. यावेळी सर्वप्रथम सरपंच शिवाजी खरात यांच्या हस्ते समाधी स्थळाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर सांडू सखाराम वाघ यांच्या स्मारकावर नाभिक संघटनेच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच शिवाजी खरात,उपसरपंच राजेंद्र बलांडे ' अ भा जिवा सेना प्रवक्ता सुरेश बोर्डे, राष्ट्रीय नाभिक संघटना संर्पक प्रमुख दादासाहेब काळे, पत्रकार अमोल कोलते, नाभिक महामंडळाचे संतोष बोराडे, संजय पंडीत, संतोष वाघ, शाम आदमाने, मधुकर वाघ, रत्नाकर गवळी, रूपेश नाईक, तालुकाध्यक्ष राजेश सुरडकर, मनोहर बलांडे, अशोक बिरारे, कचरू वाघ, पंडित बोर्डे, रुपेश नाईक,गणेश वाघ , मधुकर वाघ, पंढरीनाथ वाघ, सुभाष बलांडे , यांच्यासह अनेक ग्रामास्यांची यावेळी उपस्थिती होती.



# सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील चारमळी, गिरसावळी येथे हरीभाऊ बागडे नाना यांच्या विकास निधीतून सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन माजी मंत्री डॉ. नामदेवरावजी गाडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मा. जि. प. सदस्य  शिवाजी महाराज पाथ्रीकर, तालुकाध्यक्ष सांडू आण्णा जाधव, माजी सभापती सर्जेराव मेटे, ज्येष्ठ नेत्या मंगलाताई वाहेगावकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्या अभिषेक गाडेकर,जनार्दन शेजुळ, गजानन नागरे, वाल्मीक जाधव, बाळासाहेब तांदळे, इलियास शहा,साहेबराव बेडके, सोमिनाथ कोलते, कल्याण चव्हाण, रोषन अवसरमल, अभिषेक गाडेकर तसेच परिसरातील सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, संचालक, कार्यकर्ते, युवक, महिला व आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# राजूरमध्ये पोळा सण उत्साहात साजरा; परंतु शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आकाशाकडे

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** वर्षभर शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांचा खरा मित्र बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणजे पोळा होय. या दिवशी शेतकरी आपले लाडक्या सर्जा-राजांना सजवून पूजाअर्चा करून मोठ्या आनंदाने पुरणपोळीचा घास भरवतो. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भोकरदन तालुक्यातील राजुर येथे ग्रामस्थांच्या वतीने पारंपारिक वाद्याच्या साह्याने मिरवणूक काढत पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परंतु यावर्षी पाऊसमान कमी असल्याकारणाने पोळ्याच्या दिवशीही शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या. श्रीक्षेत्र राजूर येथे शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या सर्जा-राजांना धुवून अंगावर झूल टाकली होती. सिंगला रंगवून बेगड लावले होते. डोक्यावर बाशिंग आणि गोंडे बांधले होते. मोरकी व घुंगरमाळा घालून बैलांना सजवले होते. सायंकाळी पाचच्या सुमारास गावकऱ्यांनी मंदिरासमोर एकत्रित येऊन बैलांची पूजाअर्चा करण्यात आली. त्यानंतर पुरणपोळीचा घास भरवण्यात आला. घरोघरी ग्रहणींनी बैलांची पूजा करून पोळीचा नैवद्य  भरवला. दरवर्षीप्रमाणेच याहीवर्षी राजूरमध्ये पोळा हा सण मोठ्या उत्साही वातावरणात साजरा झाला.यावर्षी पाऊसपाणी असल्याकारणाने शेतकऱ्यांच्या मनात चिंतेचे ढग जमा झाले होते. पोळ्याच्या दिवशी का होईना परंतु पाऊस पडेल या आशेने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या. पाऊस पडावा म्हणून शेतकऱ्यांनी श्री राजूरेश्वर गणपतीला साकडे घातले. पोळा सणानिमित्त गावातील हनुमान मंदिरसमोर ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.




# एकल खिडकी प्रणालीस प्रतिसाद

## १५२ मंडळांनी केले अर्ज; ५९ मंडळांना परवानगी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवाप्रसंगी सार्वजनीक गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानगीसाठी सुरु करण्यात आलेल्या एकल खिडकी प्रणालीस चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत १५२ सार्वजनीक गणेश मंडळांनी परवानगीसाठी अर्ज सादर केले असुन ५९ मंडळांना सर्व विभागामार्फत परवानगी देण्यात आली आहे.

येत्या १९ सप्टेंबरपासून शहरात दहा दिवस गणेशोत्सव साजरा होणार आहे. याकरीता गणेश मंडळांना महापालिका व इतर विभागाकडून रीतसर परवानग्या घ्याव्या लागतात. पोलीस स्टेशन, ट्राफिक पोलीस, सार्वजनिक बांधकाम, अग्निशमन, महावितरण केंद्र, महानगरपालिका इत्यादी विभागाच्या परवानगी या एकच ठिकाणाहुन घेता याव्या यासाठी एक खिडकी प्रणाली चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यात आली आहे.

गणेश मंडळांना अर्ज करणे सोपे जावे याकरीता महानगरपालिका कार्यालयात एकल खिडकी प्रणाली मदतकक्ष सुद्धा स्थापन करण्यात आला आहे. सुटीच्या दिवशीही सदर मदतकक्ष सुरु ठेवण्यात येत असल्याने सर्व गणेश मंडळांना त्याचा लाभ मिळत आहे. HTTPS://PANDAL. CMCCHANDRAPUR.COM या लिंकद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करता येऊ शकतो. मनपा हद्दीतील १५२ सार्वजनीक गणेश मंडळांनी आतापर्यंत परवानगीसाठी अर्ज सादर केले असुन अजुन संख्या वाढण्याची शक्यता आहे. गणेशोत्सव प्रदुषणमुक्त होण्याच्या दृष्टीने पीओपी मुर्तींना थारा न देता शाडूच्या मुर्तींचाच वापर करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.


हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444

डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# बैलपोळ्याच्या दिवशी सरपंचाला मारहाण

## गावात काही लोकांचा जातीवाद होत असल्याचा सरपंच यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** अमळनेर तालुका दहिवद येथील अनुसूचित जातीचे सरपंच देवानंद बहारे यांच्यावर काही गावगुंडांनी हल्ला केला आहे दिनांक 14 सप्टेंबर रोजी दहिवद या गावात  बैलपोळा सण सुरू असताना सरपंच तेथे सणाची पाहणी करत असताना अचानक काही गावातील लोकांनी धारदार शस्त्र घेऊन त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. पीडित देवानंद बहारे यांना पुढील उपचारासाठी हिरे मेडिकल सिविल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

सरपंच देवानंद बहारे यांचे असे म्हणणे आहे की गावात जातिवाद मोठ्या प्रमाणात सुरू आहे हल्लेखोरातील एक व्यक्ती श्यामकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी माहिती अधिकार पत्र टाकले महिन्या आधीच माहिती पुरवण्यापूर्वी श्यामकान यांनी पैशांची मागणी केली सरपंचांनी या गोष्टीला विरोध केला व तुला माहिती मिळेल पैशांची मागणी करू नको त्या गोष्टीचा राग देखील शामकांत पाटील यांच्या मनात होता. व वेळ पाहताच त्यांचे साथीदार कुणाल पाटील, जयेश पाटील,योगेश पाटील, प्रदीप पाटील, जितेंद्र पाटील, बाळासाहेब पाटील, संजय पाटील व इतर साथीदार यांनी पोळा सणाच्या दिवशी धारदार शस्त्राच्या साह्याने मारहाण केली असे पीडित देवानंद बहारे यांनी प्रसार माध्यमांना सांगितले व पुढील कारवाईसाठी प्रक्रिया सुरू आहे.



# भंडाऱ्यात पावसाचे दमदार पुनरागमन

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** दीर्घ काळाच्या विश्रांतीनंतर जिल्ह्यात दमदार पावसाचे पुनरागमन झाले आहे. जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे नदी-नाले दुथडी भरून तर ओढे, तलाव ओसंडून वाहत आहेत. अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.  धोक्याची पातळी २४५.५० मीटर असताना काल पाणी पातळी २४४.१९ पर्यंत पोहचली होती. मात्र आपत्ती व्यवस्थापन विभागाने  ताबडतोब पाण्याच्या विसर्ग सुरू केला असून पाणी पातळी नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. सध्या ही पाणी पातळी २४४.०६ मी. असून धोक्याच्या पातळीपेक्षा साधारणतः १ मीटरने खाली आहे. पुढील काही तास संतत धार पाऊस वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# गडचिरोलीत रुजू न होणे भोवले

## शासनाच्या आदेशाने तीन तहसीलदार निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** आदिवासी जिल्हा, नक्षलग्रस्त जिल्हा अशी चुकीची ओळख करून ठेवलेल्या महाराष्ट्रातील शेवटचे टोक असलेला गडचिरोली जिल्हा आजही अनेक आधुनिक सोईसुविधांपासून वंचित आहे. आणि म्हणूनच या जिल्ह्याला शासकीय कर्मचाऱ्यांकडून नापसंती दर्शविण्यात येते. अशाच पद्धतीने बदली होऊनही रुजू होण्यास नापसंती दर्शवीणाऱ्या तीन तहसीलदारांचे निलंबन करण्यात आले आहे.

बि. जे. गोरे , सुरेंद्र दांडेकर, विनायक थविल असे या तीन तहसीलदारांची नावे असून १२ सप्टेंबर ला महसुल व वन विभागाचे अव्वर सचिव संजीव राणे यांनी त्यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. या निलंबन कारवाईमुळे गडचिरोली जिल्हा तसेच संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. राज्याचे शेवटचे टोक असलेला गडचिरोली जिल्हा म्हणजे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी शिक्षेचा जिल्हा म्हणून ओळख आहे. बरेच अधिकारी यामुळेच ईथे यायला नाखूष असतात. बदली किंवा नियुक्ती झाली तरी रुजू होत नाहीत. दिवस पुढे ढकलत राहतात. असाच प्रकार या तिन तहसीलदारांच्या बाबतीतही झाला. राज्याच्या महसूल व वन विभागाने ३०|६|२०२३ ला तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. यात बि.जे.गोरे यांची गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली येथे , सुरेंद्र दांडेकर यांची धानोरा येथे तर विनायक थविल यांची देसाईगंज येथे नियुक्ती झाली होती. मात्र दिलेल्या मुदतीत हे तिनही तहसीलदार आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत. त्यामुळे प्रशासकीय कामकाज विस्कळीत झाले . दुर्गम भागात प्रशासकीय कामात सुसूत्रता व गतिमानता आणण्यासाठी येथे पूर्णवेळ अधिकारी असणे आवश्यक आहे. परंतू , नियुक्ती होऊनही नियुक्ती आदेशाला न जुमानता तीनही तहसीलदार रुजू झाले नाहीत. त्यामुळे गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय मिना यांनी रुजू न झालेले तहसीलदार ब.जे.गोरे , सुरेंद्र दांडेकर, विनायक थविल यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी असा प्रस्ताव शासनाला पाठवला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी पाठविलेल्या या प्रस्तावाची शासनाने गंभीर दखल घेत तीनही तहसीलदारांना निलंबन करण्याची कारवाई केली आहे. शासनाच्या या आदेशाने गडचिरोली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांमधे मात्र एकच हडकंप माजला आहे.



# सावळदबारा येथे पोळा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे शेतकऱ्यांचा  मित्र सर्जाराजा (बैल)  यांचा आज पोळा सण शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. यंदा वरूणराजाने कृपा केल्याने रुसलेला पाऊस सुरू झाल्याने पिकाच्या उत्पादनात वाढ होणार असल्याची माहितीही सांगत होते.यावेळी दरवर्षी प्रमाणे गावाचे मानाच्या बैलाचे पूजन मारोतीरायाच्या मंदीराजवळ करण्यात आले. शेतकऱ्यांची पारंपारीक पध्दतीने पूजा करून गावात बैलांना मिरवण्यात चक्रधर स्वामी मंदीरावर आले आणि तिथून घरोघरी बैल घेवून जाणाऱ्या शेतकऱ्यांचा नागरिकांनी नारळ देवून सत्कार केला. बैलांची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दिला. दूपारी ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत पोळा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. शेतकऱ्यांनी सकाळी बैलाना आंघोळ घालुन नवीन दोर, नाथ, मोरखी, पैजण, गोंडे, गेठा, कवडी माळ, हार गजरे, झूल घालुन सजलिवे.त्यांना पूरण पोळी, भिजवलेली चनादाळ, गुळ खाऊ घालण्यात आला. नंतर सर्व बैलानां मारूती मंदीरात दर्शनासाठी नेण्यात येऊन नंतर त्यांना घरोघरी जेवणासाठी नेण्यात आले. यावर्षी पोळा सण हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी मारोती मंदीरावर शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा बिट जमादार मिरखॉ तडवी, प्रकाश कोळी, भरत कोळी, पोलिस पा.विलास कुल्ले यांनी पोळा सणात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सोयगाव तालुक्यात सोयाबीनवरील पिवळ्या मोझॅकचे वेळीच करा नियंत्रण : सुरडकर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात यावर्षीही हंगामाच्या सुरवातीलाच काही भागात सोयाबीनवर पिवळा मोझॅक (केवडा) या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झालेला दिसून येतो आहे. यासाठी शेतकऱ्यांनी तात्काळ फवारणी करावी, असे आवाहन अर्जुन सुरडकर कृषी सहाय्यक व मानसिंग भोळे कृषी सहाय्यक यांनी केले आहे.या रोगामुळे सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.गेल्या वर्षी सोयगाव तालुक्यात बऱ्याच भागात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव झाला होता, या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झाल्यामुळे काही शेतकऱ्यांना संपूर्ण पिकचं उपटून टाकावे लागले होते. हा रोग मुंगबीन यलो मोझॅक या विषाणूंमुळे होतो. कडधान्य आणि तणे ही या रोगाची पर्यायी यजमान पिके आहेत. यावर्षीही हंगामाच्या सुरवातीलाच काही भागात सोयाबीनवर पिवळा मोझॅक (केवडा) या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झालेला दिसून येतो आहे. या रोगामुळे



सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.रोगाचे लक्षण सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे पाने दिसतात काही सोयाबीन पिकाचे वाण या रोगास लवकर आणि जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे या रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाद्वारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी.लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त पाने, झाडे दिसून येताच ती वेळोवेळी समूळ काढून नष्ट करावीत जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर,  चिकलठाणा,  छत्रपती संभाजीनगर